# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०१७ / श्रावण ५, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क, मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७८**

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१) * ३१७४० श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रविंद्र फाटक, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.परिणय फुके, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत : चंद्रपूर, अहेरी, भामरागड, नागपूर, चिमूर, गडचिरोली, देवरी, ठाणे व इतर आदिवासी विभाग आणि महामंडळात सन २००४ ते २००९ या काळात संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी ऑईल इंजिन, इंलेक्ट्रीक पंप, गॅस स्टोव्ह, गायी, म्हशी, शेळया, नांगर बैलगाडी, ताडपत्री, भाजणीचे उपक्रम, मळणींचे यंत्र, डिजीटल कॅमेरा तसेच विद्यार्थ्यांना कोचिंग क्लास, हॉटेल मॅनेजमेंट, मेडीकल प्रवेश परिक्षा फी, मिरची दळण यंत्र, पिठाची लहान गिरणी, शेवयाचे यंत्र, लाउडस्पिकर,

मंडप, किटकनाशके, स्प्रे पंप, शेतीसाठी तारेचे कुंपण, खते, शिलाई मशीन, चामडी बॅगाची निर्मिती, सुरक्षा रक्षक प्रशिक्षण, इलेक्ट्रीक मोटर रिपेरींग, फोटोग्राफी, मधुमाशी पालन प्रशिक्षण, पाळीव प्राण्यांचे प्रशिक्षण व अभ्यास क्रम न घेता किंवा खोटया प्रशिक्षणार्थीचा खर्च दाखविणे, यंत्रे खरेदी न करता आणि खरेदी करुन बोगस वितरण करणे, नववधुंना मंगळसुत्र, नवदाम्पत्याला भांडी वाटप इत्यादी कल्याणकारी योजनांमध्ये रुपये ६,००० कोटींचा गैरव्यवहार झाल्याबाबत श्री.बहिराम पोपटराव मोतीराम व इतर तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१५३/२०१२ मध्ये नमूद तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १५ एप्रिल, २०१४ अन्वये श्री.एम.जी.गायकवाड, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या पाच सदस्य समितीने दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातील आदिवासी विभागातील अधिकाऱ्यांनी जव्हार, वाडा, मोखाडा या आदिवासी भागातील वंचित विद्यार्थ्यांच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करुन आणि कंत्राटदारांशी संगनमत करुन बेरोजगारांना प्रशिक्षण, संगणक टायपिंग, एमएससीआयटी, स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी, ब्युटी पार्लर, इंग्लिश स्पीकींग अशा विविध प्रशिक्षण व गायी-म्हशी वाटपात कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे तसेच यासंदर्भात पोलिसांनी टाकलेल्या धाड सत्रात संस्थाचालकांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भातील कागदपत्रे देखील प्राप्त झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सदर अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर, अहेरी, भामरागड, नागपूर, चिमूर, गडचिरोली, देवरी या संवेदनशील आदिवासी विभागात आरोग्य, कुपोषण, बेरोजगारी, उपासमार इ. समस्या तसेच घरकुल, दुभती जनावरे पुरविण्याच्या योजना व अन्य योजनांची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने न्या.गायकवाड समितीने याबाबत निष्कर्ष न काढता चौकशीचे आदेश दिल्याचे माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व चौकशीत दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार श्री.एम.जी.गायकवाड (सेवानिवृत्त न्यायाधीश) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ३०/०१/२०१७ रोजी व मा.उच्च न्यायालयास दिनांक ३१/०१/२०१७ रोजी सिलबंद पेटीत सादर केलेला आहे.

(२), (३) व (४) गायकवाड समितीने मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात केलेला अहवाल याचिकाकर्त्यांना उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश दिनांक २७/०४/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीवेळी मा.न्यायालयाने प्रबंधक, न्यायीक-१ यांना दिले.

शासनास प्राप्त झालेला सिलबंद अहवाल उघडलेला नसल्यामुळे, सदर चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती माहे मे, २०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयास करण्यात आली. त्यानुसार, मा.उच्च न्यायालयामार्फत सदर चौकशी अहवालाची प्रत माहे मे, २०१७ मध्यावर शासनास उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

Commission of Inquiry Act, १९५२ मधील तरतूदीनुसार चौकशी समितीने सादर केलेला चौकशी अहवाल व त्यावर शासनाने केलेली कार्यवाहीची वस्तुस्थिती, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यापासून ६ महिन्यात विधीमंडळास सादर करणे बंधनकारक आहे.

गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे, विभागाकडील उपलब्ध मनुष्यबळ विचारात घेता त्याची विभागाच्या स्तरावर छाननी, विश्लेषण व करावयाच्या कार्यवाहीस विलंब होऊ शकतो. ही बाब विचारात घेऊन, भारतीय प्रशासन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांपैकी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची पूर्ण वेळ नियुक्ती करण्यात येऊन, त्याने चौकशी अहवालाचा अभ्यास करुन शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत शासनास मार्गदर्शन करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर विभागातील विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(२) * ३१२४७ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागांतर्गत नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, परभणी व भंडारा जिल्हयातील समाजकल्याण विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी सन २०१६-१७ या वर्षात ३,५७,८६५ विद्यार्थ्यांनी अर्ज करूनही महाविद्यालयाच्या निष्काळजीपणामुळे एकूण ५८,६४१ विद्यार्थी व जिल्हा पातळीवर ५७,७९६ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयातील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊन त्याचे अभिलेखे दाखल न करणाऱ्या जिल्हयातील विविध शैक्षणिक संस्थाविरूध्द सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, परभणी यांनी जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेश जारी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) अंशत : होय, परभणी जिल्हयातील बंद पडलेल्या शैक्षणिक संस्थांनी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे अभिलेख विशेष चौकशी पथकास उपलब्ध करुन दिलेले नसल्याने, सदर अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण परभणी यांनी संबंधित शैक्षणिक संस्थांना कळविले आहे.

(३) नाही. मात्र, प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु असून विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून शासनाचे DBT पोर्टल कार्यान्वित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात पायलट प्रोजेक्टच्या माध्यमातून ग्रीन एनर्जी निर्माण करण्याबाबत**

**(३) * ३२५६० श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौर उर्जेवर अवलंबून असणाऱ्या पायलट प्रोजेक्टच्या माध्यमातून सौर ऊर्जेचा विकास करून ग्रीन एनर्जी निर्माण करण्याचे धोरण शासनाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार वीज पुरवठा विभागाने सदर पायलट प्रोजेक्ट रायगड जिल्ह्यात कृषीपंप, नळपाणी योजनांसाठी राबविण्याचा निर्णय घेतला असला तरी शेतकरी दुर्गम भागातील असावा, त्याच्याकडे कमीत कमी ५ एकर जमीन असावी, शाश्वत पाण्याचा स्त्रोत असावा तसेच रूपये १५ हजार शासनाकडे भरणा करणे आवश्यक असणे अशा जाचक अटींचा समावेश असल्याने या निकषांमध्ये बसणारा एकही लाभार्थी रायगड जिल्ह्यात नसल्याने हा पायलट प्रोजेक्ट असफल ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने निकष शिथिल करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे, याबाबतच्या अटल सौर कृषीपंप योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचा समावेश नाही.

(३) शासन निर्णय सौर प्र-२०१६/प्र.क्र.३१९/ऊर्जा-७, दिनांक ०५/११/२०१६ नुसार सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शासनाने पुढील निकष शिथिल केले आहेत, जसे लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे क्षेत्र ५ एकर ऐवजी १० एकर करण्यात आले आहे व सौर कृषीपंप योजनेचा फायदा घेऊन ज्या गटांमध्ये/ विहीरीवर सौर पंप दिला आहे तेथे सौर कृषीपंप आस्थापित झाल्याच्या दिनांकानंतर पुढील १० वर्षानंतर सदर ठिकाणी मागणी केल्यास महावितरण मार्फत विद्युत जोडणी/ पुरवठा देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांडोली तसेच खेड व मावळ (जि.पुणे) तालुक्यात वीज उपकरणे पडून असल्याबाबत

**(४) * ३२९२७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांडोली तसेच खेड व मावळ (जि.पुणे) या तालुक्यांसाठी वापरावयाची इन्सुलेटर, पोल, कंडक्टर, केबल, मीटर तसेच अन्य कोट्यवधी रुपयांची वीज उपकरणे पडून असल्याचे माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर उपकरणे निकामी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीच्या साहित्यांचा योग्य वापर न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) याबाबतची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. परंतु सदरची बातमी वस्तुस्थितीस धरुन नाही. खेड व मावळ (जि.पुणे) या तालुक्यांसाठी वापरण्यात येणारी वीज उपकरणे राजगुरुनगर विभागांतर्गत चांडोली येथील भांडारात सुरक्षित ठेवण्यात आली असून राजगुरुनगर विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या उपविभागांना आवश्यकतेनुसार सदर विद्युत साहित्याचा पुरवठा करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असणाऱ्या शाळांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * ३२६७९ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असणाऱ्या शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची पदे अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

(२) रिक्त असलेल्या पदांची भरती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त यांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार अधिक्षक (पुरुष/ महिला) रिक्त पदे भरती सुरु करण्यात आली असुन निवड प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. या व्यतिरिक्त पदोन्नतीने देखील पद भरती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वर्धा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पावसामुळे तूरीचे नुकसान झाल्याबाबत**

**(६) * ३३४६६ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांकडून शासनाने खरेदी केलेली हजारो क्विंटल तूर पावसात भिजल्याने शासनाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तूर सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांची असून गोदाम उपलब्ध असतांना तसेच पर्यायी व्यवस्था न केल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) नाही.

किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तूरीची साठवणूक करण्याची जबाबदारी पणन महासंघामार्फत खरेदी करण्याऱ्या सबएजंट संस्थेची असते. वर्धा जिल्ह्यात खरेदी केलेल्या तूरीची साठवणूक केंद्र व राज्य वखार महामंडळाच्या गोदामात केलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसतिगृहांसाठी नियमित गृहपाल व सुरक्षा रक्षकांच्या नियुक्त्या करणेबाबत**

**(७) * ३२१६९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७४१४ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने मागासवर्गीय मुलींसाठी स्थापन करण्यात आलेल्या ५० व पूर्वीच्या १६७ वसतिगृहांसाठी शासकीय इमारती, गृहपाल व सुरक्षारक्षक नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय इमारती, मुलींच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने वसतिगृहांवर महिला गृहपाल व सुरक्षा रक्षकांच्या तसेच इतर वसतिगृहांवर गृहपाल व सुरक्षा रक्षकांच्या नेमणूका करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ज्या वसतिगृहातील गृहपालांची पदे रिक्त आहेत अशा वसतिगृहातील गृहपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य गृहपाल यांचेकडे स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन अन्य सक्षम अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने वसतिगृहातील प्रवेशित मुलामुलींच्या संख्येनुसार बाहयस्त्रोतादवारे साईट अटेंडन्ट यांची नियुक्ती केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लासलगाव बाजार समिती (ता.निफाड, जि.नाशिक) खरेदी केंद्र पुर्ववत सुरु करण्याबाबत**

**(८) * ३०९५४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव बाजार समिती (ता.निफाड, जि.नाशिक) येथे शेतकरी, माथाडी व मापारी कामगारांना मजुरीची रक्कम धनादेशाने देण्याच्या कारणामुळे सदर बाजार समिती सलग ५ दिवस बंद असल्याने तेथील व्यापाऱ्यांनी निफाड - नैताळे रस्त्यालगत प.पु.भगरीबाबा हे खासगी कांदा खरेदी केंद्र सुरु केल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २४ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास माथाडी व मापारी कामगारांनी आंदोलन करून सदर लिलावगृह बंद पाडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी लिलावगृह बंद करून लासलगाव बाजार समिती पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी सर्व संबंधितांची बैठक घेतली होती. मात्र, बैठकीत तोडगा न निघाल्याने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी पो.स्टे. लासलगाव यांना सदरचे विनापरवाना सुरू असलेले कांदा खरेदी विक्री केंद्र बंद करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार दिनांक २५/४/२०१७ पासून लासलगाव व निफाड येथील खाजगी लिलाव केंद्र बंद झाले आहेत. लासलगांव मुख्य बाजार आवारातील दिनांक २१/४/२०१७ पासून भुसार व तेलबिया शेतीमालाचे व दिनांक २ मे, २०१७ पासून कांदा हया शेतीमालाचे लिलाव पूर्ववत सुरू केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे विजेचे खांब बदलून वीज पुरवठा सुरळीत करणेबाबत

**(९) * ३२७३६ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि. ठाणे) महावितरण कंपनीने झाडांनाच विजेच्या तारा बांधून घरांना वीज जोडण्या देणे, शहापूर तालुक्यात ८ तास वीज खंडित होणे व विजेचे खांब जीर्ण झालेले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खर्डी गावातील ३० पेक्षा अधिक खांब पूर्णपणे जीर्ण झाले असून पावसाळ्यात कधीही कोसळण्याची भिती असल्याने वीज ग्राहकांनी केलेल्या तक्रारी दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने सदरहू प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) एप्रिल, २०१७ मध्ये वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने पाहणी केली असता खर्डी येथे काही घरांना होणारा वीज पुरवठा पोलपासूनचे अंतर जास्त असल्यामुळे सर्व्हिस वायर लोबंकळत होत्या. सदर ठिकाणी नवीन पोल उभारणी करुन दिनांक २५/४/२०१७ रोजी त्याची दुरुस्ती करण्यात आली. वीज पुरवठा सुरळीत होण्याच्यादृष्टीने वीज वाहिन्यांजवळ असणारी झाडे तोडून वीज पुरवठा नियमित करण्यात आला.

(३) सदर भागातील ५ उच्चदाब व ३२ लघुदाब पोलच्या वाहिनीचे अंदाजपत्रक मंजूर असून सदर कामांचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने ३ उच्चदाब वाहिनीचे पोल व ७ लघुदाब वाहिनीचे पोल बदली करण्यात आलेले आहेत व उर्वरीत कामे प्रगती पथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील टेमघर येथील भंगार गोदामाला लागलेल्या आगीबाबत

**(१०) * ३२५०५ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील टेमघर येथील भंगार गोदामाला दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसाहतीतील कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक व लोखंडी ड्रममधून वेस्ट सॉलवंड (रासायनिक पदार्थ) भंगारामध्ये विकण्यासाठी अनधिकृतरित्या गोदामात साठवून ठेवतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भंगार गोदामाला यापूर्वी अनेक वेळा आगी लागण्याचे प्रकार घडूनही संबंधित विभागाकडून कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. अशा प्रकारची बाब तपासात आढळून आलेली नाही.

(३) हे खरे नाही. आग लागण्याची घटना पूर्वी घडलेली नाही.

(४) व (५) आग ही अज्ञात कारणामुळे लागल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेत (बार्टी) लॅपटॉप खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) * ३२३५१ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेत (बार्टी) अनुसूचित जाती, जमाती व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी लॅपटॉप खरेदीमध्ये रुपये ५१ लाख ६८ हजारांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार लॅपटॉप खरेदीत गैरव्यवहार करणारे व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, खरेदी प्रक्रियेमध्ये अपहार झालेला नाही.

लॅपटॉप खरेदीमध्ये अपहार झालेला नसून खरेदीनंतर लॅपटॉपचा कार्यभार हाताळणाऱ्या प्रकल्प अधिकाऱ्याने लॅपटॉपचा अपहार केलेला असल्याचे अंतर्गत लेखा परिक्षणातून प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे.

(२) या प्रकरणी संबंधित प्रकल्प अधिकारी श्री.राहुल रणवीर यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन, कोरेगाव पार्क, पुणे येथे दिनांक २९/०५/२०१७ रोजी FIR दाखल करण्यात आलेला आहे. प्रकरण पोलीस कार्यवाहीत असल्यामुळे कोणासही पाठीशी घालण्याचा प्रश्न उपस्थित झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लघू व मध्यम उद्योग बंद झाल्याबाबत

**(१२) * ३३०३२ डॉ.सुधीर तांबे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र आणि मेक इन नाशिक या माध्यमातून गुंतवणूकीसाठी उद्योगांना चालना दिली जात असतांना मागील पंधरा वर्षात नाशिक तसेच इतर जिल्हयातील सुमारे ४५ हजार उद्योग विविध कारणांमुळे बंद/आजारी पडल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध कारणांनी बंद/आजारी असलेल्या नाशिक तसेच राज्यातील इतर विभागातील ६९९६ उद्योगांतील २२ लाखाहून अधिक कामगार बेरोजगार झाले असून सदर उद्योगांमध्ये रुपये ३११९ कोटी गुंतवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात तसेच नाशिक विभागात विविध कारणांनी बंद/आजारी असलेल्या उद्योगांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न व विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

उद्योग संचालनालयाच्या जिल्हा स्तरावरील अभिलेख्यानुसार ४ थ्या औद्योगिक प्रगणनेच्या अहवालानुसार राज्यामध्ये ३४३२७ लघुउद्योग बंद पडलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होण्यासाठी आणि बंद उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २ मे, २०१३ अन्वये विशेष अभय योजना जाहिर केली होती.

सदर योजनेतंर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पुर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर योजनेमध्ये पात्र ठरणाऱ्या घटकांनी राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्यास व्याज व दंड व्याज माफ करण्याची तरतूद आहे.

सदर योजनेस शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१६ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने केलेल्या वीज दरवाढीबाबत**

**(१३) * ३०९०४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने माहे जून, २०१५ ते एप्रिल, २०१७ या तीन वर्षात १५४ ते २७४ टक्के दर वाढ लागू केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टप्याटप्याने वाढणाऱ्या या वीज दरवाढीमुळे माहे एप्रिल, २०१९ पर्यंत शेतकऱ्यांच्या कृषीपंप विजेचे दर किमान दुप्पट ते तिप्पट होणार असल्याने कृषी पंपाच्या वीज दरात सवलत देणे व सवलतीचे वीज दर जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ च्या वीजदर आदेशानुसार सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीकरिता एकूण सरासरी वीजदरात जून, २०१५ च्या तुलनेत केवळ १.२०% ते २% इतकी वाढ झाली आहे.

(२) सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० साठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या दरानुसार विना मीटर कृषी ग्राहकांच्या वीज दरात अनुक्रमे ५.२%, ५.२%, ४.६% व मीटर असलेल्या कृषी ग्राहकांच्या वीज दरात अनुक्रमे ३.५%, ३.४% व ४.२% इतकी वाढ होणार आहे. दिनांक ११/१०/२०१२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वीज दर सवलतीसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम असून वीज दरवाढीचा भार संबंधित कृषीपंपधारक ग्राहकांनी भरावयाचा आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१४) * ३२२२७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबै बँकेच्या (मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) संचालक मंडळाने नाबार्डची परवानगी तसेच रिझर्व बँक ऑफ इंडियाचे निर्बंध विचारात न घेता निव्वळ मालमत्ता मूल्यापेक्षा (नेटवर्थ) अधिक म्हणजे तब्बल ३५० कोटी रुपयांचे कर्ज नियमबाहय पध्दतीने पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी मंजूर केल्याचे माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बँकेच्या संचालक मंडळाच्या गैरकारभाराची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील घनकचरा उचलण्याबाबत**

**(१५) * ३२३०८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील सम्प (सांडपाणी जमा करण्यासाठी वापरण्यात येणारी) ३ मधून काढण्यात आलेला सुमारे ४०० मॅट्रीक टन कचरा उचलण्याचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने औद्योगिक विकास मंडळास दिनांक ३० मे, २०१७ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार संप क्रमांक ३ मधून निघालेला संपूर्ण रासायनिक गाळ महामंडळाने मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि., तळोजा या मान्यता प्राप्त प्रक्रिया केंद्राकडे पोचविला असून, आता जागेवर कोणताही गाळ शिल्लक नाही. सदर गाळ उचलण्याची व प्रक्रिया केंद्राकडे पोहचविण्याची कार्यवाही दिनांक १७/०६/२०१७ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * ३३७०९ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेची ८० प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुनही मंजूरीकरिता संबंधित अधिकाऱ्यांकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग शाळेतील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(१७) * ३२२८७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८५३९ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग शाळांतील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, त्याबाबतची वस्तुस्थिती वा सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माणगाव (जि.रायगड) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्याबाबत**

**(१८) * ३२९२४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासनाने रुपये २ कोटी मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मारकाची सद्यस्थिती काय आहे, यासाठी आतापर्यंत किती खर्च करण्यात आला व हे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एकलहरे (जि.नाशिक) येथील औष्णिक वीज प्रकल्पास विलंब होत असल्याबाबत**

**(१९) * ३०९१६ श्री.नारायण राणे, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६४५७ ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेचे भारनियमन सुरु असून त्यास एकलहरे (जि.नाशिक) औष्णिक केंद्रामधील नादुरुस्त व कमी क्षमता असलेले संच देखील कारणीभूत असल्याचे तसेच येथील औष्णिक वीज केंद्रातील ६६० मेगावॅटचा प्रकल्प खाजगी वीज प्रकल्पामुळे प्रलंबित असल्याचे दिनांक ६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकलहरे औष्णिक विद्युत केंद्रावर चार वर्षापूर्वी पाच संच कार्यान्वित होते त्यापैकी दोन संच तीस वर्षापेक्षा अधिक जुने कालबाह्य झाले असून उक्त संच बदलून नविन संच जोडणे, प्रलंबित वीज प्रकल्प सुरु करणे तसेच भारनियमन बंद करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व संच (३ X २१० मे.वॅ.) दिनांक ०६ मे, २०१७ रोजी कार्यान्वित होते.

(२)

• नाशिक औ.वि.केंद्रातील २ संच (२X१२५ मे.वॅ.) हे कालबाह्य व जीर्ण झाल्याने दिनांक ३०/०६/२०११ रोजी कायमस्वरुपी बंद करण्यात आले आहेत.

• नाशिक येथील उर्वरित ३ संच (३X२१० मे.वॅ.) आजतागायत वीजनिर्मितीसाठी उपलब्ध आहेत.

• नाशिक येथील प्रस्तावित ६६० मे.वॅ. प्रकल्प हाती घेणे सध्या MERC च्या MOD प्रणाली तत्वानुसार वाणिज्यिकरित्या व्यवहार्य (viable) असणे आवश्यक आहे.

• सद्यस्थितीत राज्यात भारनियमन करण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत झालेल्या गैरव्यवहाबाबत

**(२०) * ३२४०१ श्री.विक्रम काळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय व अन्य विभागामार्फत देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता गृह विभागामार्फत दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी विशेष चौकशी पथकाची (टास्क फोर्स) नियुक्ती करण्यात येऊन या पथकाने आपला अहवाल सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.के.व्यंकटेशम, भा.पो.से., विशेष चौकशी पथक (टास्क पोर्स) यांनी दिनांक ३ डिसेंबर, २०१६ रोजी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना चंद्रपूर, बुलढाणा, सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील १० संस्थांच्या अनियमितता व गैरव्यवहारासंबंधी गुन्हे दाखल करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.के.व्यंकटेशम विशेष चौकशी पथक (टास्क फोर्स) यांना केवळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचा अधिकार असतांना त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर जावून आपल्या अधिकाराचा गैरवापर केला असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय,

(२) होय,

(३) विशेष चौकशी पथकाने केलेल्या चौकशीत संबंधित संस्थांद्वारे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे आढळुन आल्याने, संबंधित १० संस्थांकडुन वसुलपात्र रक्कम वसूल करण्याबाबत व सदर संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(४) नाही, या प्रकरणी विशेष चौकशी पथकाकडुन अंतिम अहवाल अद्याप शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ३१९७० डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.विनायकराव मेटे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पश्चिम महाराष्ट्र व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषीपंप वीज जोडणी मिळविण्यासाठी माहे मे, २०१७ अखेर अर्ज व अनामत रक्कम भरूनही वीज जोडणीची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील ५० हजार प्रलंबित प्रकरणांपैकी सातारा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये कृषीपंप विद्युत जोडणीसाठी १४ हजार ६३६ शेतक-यांनी अर्ज केले असून यामधील ८ हजार ९६२ कृषीपंपाची वीज जोडणीकरिता अनामत रक्कम भरुनही प्रलंबित असल्याचे तसेच बीड जिल्ह्यात वीज जोडणीकरिता शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केली जात असल्याचे माहे मे, २०१७ रोजी मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देवून प्रत्यक्ष वीज जोडणी देणे व जादा रक्कमेची मागणी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर वीज जोडण्या किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) पश्चिम महाराष्ट्रात मे, २०१७ अखेर ५०,२४३ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यापैकी सातारा जिल्हयात मे, २०१७ अखेर १०,९१२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. बीड जिल्हयामध्ये मार्च, २०१७ अखेर ६,७७० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. तसेच बीड जिल्हयात वीज जोडणीकरीता शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केली जात नाही.
(३) विविध योजनांतर्गत पश्चिम महाराष्ट्र व बीड जिल्हयांमध्ये कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**विक्रमगड (जि.ठाणे) येथे आंबेडकर भवन उभारण्याबाबत**

**(२२) * ३१६०० श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.ठाणे) येथे आंबेडकर भवन उभारण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**भंडारा येथे वीज पुरवठा सुरळीत करताना महिला कर्मचारी जखमी झाल्याबाबत**

**(२३) * ३३२९८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथे वीज पुरवठा सुरळीत करताना ११ केव्हीच्या जिवंत वीज तारांना स्पर्श झाल्याने महिला कर्मचारी गंभीर जखमी होऊन तीचा उजवा हात निकामी झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनित्रावरील वीज पुरवठा बंद करण्याची एबी स्वीचची देखभाल दुरुस्ती वर्षभरापासून करण्यात आलेली नसणे, आवश्यक साहित्य वीज कंपनीकडे उपलब्ध नसणे तसेच सदर स्वीच चालू स्थितीत असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यानेच सदर अपघात झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर अपघाताची विद्युत निरिक्षक, भंडारा कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. भंडारा जिल्हा सत्र न्यायालयासमोर रोहित्र डीपी बाबतची तक्रार निवारण करण्याकरिता महावितरणचे तांत्रिक कर्मचारी घटनास्थळी डी.पी. ची पाहणी करण्याकरिता गेले असता त्याठिकाणी प्रथम ट्रान्सफॉर्मर डी.पी. स्ट्रक्चरचे असलेले ए.बी.स्विच ओपन करुन ११ के.व्ही. वीजपुरवठा खंडीत करण्यात आला. तथापि, ए.बी.स्वीचचा एक दांडा (लेग) खराब झाला असल्यामुळे आर फेज डायरेक्ट जोडण्यात आला होता. यामुळे तो विद्युत भारीत होता. दरम्यान श्रीमती संध्या खोब्रागडे यांनी सुरक्षा साधनांचा वापर न करता डी.पी. स्ट्रक्चरवर चढून एल.टी. केबल क्लॅम्पमधून सोडण्याचा प्रयत्नात त्यांच्या हाताचा स्पर्श डी.पी. स्ट्रक्चरचा विद्युत भारीत आर फेजच्या ए.बी.स्विच ते डी.ओ. च्या जंपर्सला स्पर्श होताच जोराचे फ्लॅश ओव्हर होऊन त्यांचा हात गंभीररित्या भाजला गेला. या अपघात प्रकरणी महावितरणचे दोन वरिष्ठ तंत्रज्ञ यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्याबाबत**

**(२४) * ३०८८४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.तानाजी सावंत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २७४७४ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी मा.राज्यपाल यांनी आवश्यक सूचना देऊनही आश्रमशाळेमध्ये नियमानुसार मुलांची २० प्रकारच्या आजाराची तपासणी न करता सदर योजना औपचारिकता म्हणून राबविण्यात येणे, मुलभूत सोयी सुविधांचा तुटवडा व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, सर्पदंश इ. कारणांमुळे सन २०१६-२०१७ या वर्षात अनुदानित आश्रमशाळेतील ६५ तर शासकिय आश्रमशाळेतील ६७ असे सुमारे १३२ तसेच तळोदा (जि.नंदुरबार) १६६, धारणी (जि.अमरावती) ७१, कळवणे (जि.नाशिक) ७०, नाशिक ५६, व डहाणू येथे ५१ असे मागील १५ वर्षात १ हजार ७७ मुलांचे मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी दिनांक ३० मे, २०१६ रोजी नियुक्त केलेल्या डॉ. सुभाष साळुंखे यांच्या समितीने सकस आहार, राहण्याची उतत्म सोय, आरोग्य तपासणी करणे इ.सुचविलेल्या महत्वाच्या उपाययोजनांवर शासनाने अंमलबजावणी केली नसल्याने याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, सचिव, आदिवासी विकास व सार्वजनिक आरोग्य तसेच आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे समर्थन या संस्थेने दिनांक ६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यू रोखणे व मृत विद्यार्थ्यांच्या कुटूंबास आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २००१-०२ ते २०१५-१६ या कालावधीत आदिवासी आश्रमशाळांमध्ये विविध कारणांमुळे १०७७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची बाब आढळून आली आहे.

(२) होय.

"समर्थन" या संस्थेचे दिनांक ०६/०६/२०१७ रोजीचे निवेदन शासनाकडे प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांना आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूबाबत अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने स्वत:हुन दखल घेऊन डॉ.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार जिल्हाधिकारी स्तरावर आढावा गटाची स्थापना, वैद्यकीय सामाजिक विश्लेषण समिती आढावा पथकाची स्थापना, जिल्हाधिकारी स्तरावर विद्यार्थी मृत्यू त्रैमासिक आढावा समिती स्थापना, जेवणाच्या वेळेत बदल, पालकांचे संमतीपत्र, वैद्यकीय सेवेविषयी फलक लावणे, किमान क्रिडा सुविधा, मादक पदार्थ सेवन मनाई, आरोग्य तपासणी, विशेष दुरुस्ती मोहिम, ॲम्बुलन्स सेवा, तातडीने वैद्यकीय निधी व देखभाल दुरुस्ती इत्यादीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

शासकीय आश्रमशाळांत मृत्यू पावलेल्या सर्व प्रकरणात विद्यार्थ्यांच्या पालकांना अनुज्ञेय सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**समाजकल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करणेबाबत**

**(२५) * ३३७४८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी समाजकल्याण विभागामार्फत विविध प्रकारच्या शिष्यवृत्या दिल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिष्यवृत्यांची निर्धारित केलेले दर ही त्या कालावधीतील परिस्थितीचा विचार करून आकारण्यात आलेले असल्याने सद्यस्थितीच्या महागाई दराचा विचार करता शिष्यवृत्तीचे दर हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी अपुरे असून त्यात वाढ करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक ३१/१२/२०१० च्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत असुन, त्यासाठी केंद्र शासनाने शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेले दर लागू आहेत. केंद्र शासनाने या दरात अद्याप वाढ केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या साहित्य खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२६) * ३२४१५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.शरद रणपिसे, श्री.बाळाराम पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत वॉटर कूलर, चादरी, ब्लॅकेट, सौर कंदील, चपला, जोडे, मुलींसाठी गाऊन, मुलांसाठी नाइट ड्रेस, पुस्तके इत्यादी वस्तुंची खरेदी तसेच राज्यात २८३ वसतिगृहे व ५७ निवासी शाळा अशी एकूण ३४० संख्या असताना सन २०१२-२०१३ मध्ये नियमांचे उल्लंघन करून रुपये १२ कोटी ९० लाखाचे अनावश्यक ४१८ वॉटर प्युरिफायर खरेदी करण्यात येऊन प्रत्यक्षात एकाही ठिकाणी प्युरिफायर देण्यात न येणे अशाप्रकारे वसतिगृहे व रमाई घरकुल योजनांमध्ये रुपये ४०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०११ ते २०१४ या कालावधीत विविध प्रकारे रुपये ४०० कोटींच्या खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहारांपैकी प्रकरणात सामाजिक न्याय विभागाचे मंत्रालयीन अधिकारी, पुणे आयुक्तालयातील अधिकारी आणि प्रादेशिक उपायुक्त अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याबाबत नियंत्रक आणि महालेखाकार यांनी केलेल्या तपासणीमध्ये आक्षेप नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हे नोंदवून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) तालुक्यातील उपकेंद्राची दुरुस्ती व प्रलंबित कामांबाबत**

**(२७) * ३१३०६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २२४५१ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राची दुरुस्ती विहित मुदतीत न केल्याने हे उपकेंद्र पूर्ण क्षमतेने चालत नसून त्यांचे लोड ऑडिट करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.ऊर्जा मंत्री यांचेकड़े केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हयात अनेक कंत्राटदारानी विहित मुदतीत काम न केल्यामुळे कृषीपंपाचे विद्युतीकरण, जुन्या तारा बदलणे, जनित्र व नवीन एस.आय.ची कामे प्रलंबित असल्याने जिल्हयातील वाडया, वस्त्या व गावे अंधारात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वारंवार तक्रारी व लेखी पत्र देऊनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्हा विशेषतः गेवराई तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत होणे तसेच इतर प्रलंबित कामे पूर्ण होण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीमार्फत वेळोवेळी दुरुस्तीची कामे करण्यात येऊन सदर ठिकाणच्या एकूण १६ पैकी २ उपकेंद्रे वगळता अन्य उपकेंद्रे पूर्ण क्षमतेने चालू आहेत.

(२) व (३) जीर्ण झालेल्या लघुदाब वाहिनीच्या तारा बदलण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे वाडया, वस्त्या अंधारात नाहीत परंतु ज्या नवीन वाडया वस्त्या स्थापित झालेल्या आहेत अशा वाडया वस्त्यांना सध्या कृषि वाहिनीवरुन वीज पुरवठा सुरु असून सदरील वाडी - वस्ती विद्युतीकरणासाठी दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत नविन रोहित्रे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(४) बीड जिल्हा विशेषत: गेवराई तालुक्यात वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत व जिल्हा एकात्मिक योजनेंतर्गत कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नाफेडने खरेदी केंद्रे बंद केल्यामुळे शेतकऱ्यांची तूर पडून असल्याबाबत

**(२८) * ३१२९७ आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.तानाजी सावंत, श्री.सुभाष झांबड, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २७५९० ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तूरीच्या विक्रमी उत्पादनामुळे राज्यात तसेच अंबेजोगाई (जि.बीड) तालुक्यात शेतकऱ्यांच्या तूर खरेदीसाठी सुरु केलेली खरेदी केंद्रे दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांची तूर हमी भावाला देखील खरेदी केली जात नसल्याने केंद्राने राज्यातील घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना तूरसाठा करण्याची मर्यादा तिपटीने वाढविण्याची परवानगी दिल्याने तूरडाळीची कृत्रिम टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदर व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या तूरीची आकडेवारी शासनाने तयार केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तूर खरेदी केंद्र बंद करणे व ज्या शेतकऱ्यांच्या सातबारावरील पीक पेऱ्यावर तूरीची नोंद आहे, त्यांच्याकडूनच तूर खरेदी केली जाईल तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी पंचनामे केल्याखेरीज बाजार समितीतील तूरीची खरेदी केली जाणार नाही या शासनाच्या जाचक अटींमुळे तसेच मराठवाड्यातील परभणी जिल्हयातील पाचही तूर खरेदी केंद्रे दिनांक १० जून, २०१७ पासून बंद केल्याने सुमारे १३ हजार क्विंटल, विदर्भातील यवतमाळ जिल्हयातील वणी बाजार समितीतून टोकन घेतलेल्या ४३ शेतकऱ्यांची ६०० क्विंटल व राज्यातील इतर विभागात लाखो क्विंटर तूर खरेदीविना पडून असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत नाफेडने किती तूर खरेदी केली व किती तूर विक्रीविना पडून आहे तसेच शासनाच्या उपरोक्त निर्णयाविरोधात शेतकऱ्यांनी तीव्र निषेध करुन आंदोलनाचा निर्णय घेतला असल्याने शासनाने सदर निर्णयाचा फेरविचार करुन तूर खरेदी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) केंद्र शासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत करण्यात येणारी तूर खरेदी दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी बंद करण्यात आली आहे.

(२) राज्यात दिनांक १५/१२/२०१६ पासून किमान आधारभूत दराने (रुपये ५०५०/-) तूरीची खरेदी किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत सुरु करण्यात आली होती. बाजारपेठेतील आवक जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा या हेतुने घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांनी करावयाच्या साठा मर्यादेत वाढ करण्यात आली होती.

व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या तूरीची आकडेवारी शासनाने तयार केलेली नाही.

(३) केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत दिनांक २२/४/२०१७ पर्यत तूरीची खरेदी झाल्यानंतरही दिनांक २२/४/२०१७ रोजी खरेदी केंद्र खरेदी विना शिल्लक असलेल्या जवळपास १० लाख क्विंटल तूर खरेदीसाठी राज्य शासनाने या अटी घातल्या होत्या. केवळ शेतकऱ्यांचीच तूर खरेदी करावी हा त्यामागील उद्देश होता. राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेत विविध कालावधीत १५.३८ लाख क्विंटल तूर खरेदी केलेली आहे.

(४) नाफेडने किंमत स्थिरता निधी योजना व Price Support Scheme या योजनेमध्ये एकूण ४४.७४ लाख क्विंटल तूर खरेदी केलेली आहे.

हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यात केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये एकूण ६७.३४ लाख क्विंटल तूरीची खरेदी झालेली आहे.

दिनांक ३१/५/२०१७ पर्यंत टोकन दिलेल्या शेतकऱ्यांकडे असलेल्या तूरीपैकी शेतकऱ्याच्या घरी सद्या असलेली तूर, त्यांनी यापुर्वी विक्री केलेली तूर तसेच सदर तूर व्यापाऱ्यांची आहे का ? यासंदर्भात संबंधित जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात उद्योगांना चालना मिळण्यासाठी गुंतवणूक करणाऱ्या ब्रिटीश कंपन्यांना सहकार्य करण्याबाबत

**(२९) * ३२४१४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संरक्षण उत्पादन निर्मितीसाठी पोषक वातावरण व साधनसामग्री असल्याने ब्रिटीश कंपन्यांनी येथे गुंतवणूक केल्यास राज्य शासन त्यास मदत करेल असे प्रतिपादन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१७ अखेरपर्यंत ब्रिटीश कंपन्यांनी राज्यात किती प्रमाणात गुंतवणूक केली व किती उद्योगांना शासनाने सहकार्य केले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय,

दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी ब्रिटनचे संरक्षण मंत्री यांनी ब्रिटीश शिष्टमंडळासोबत मा. मुख्यमंत्री महोदय यांची वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेतली होती. सदर भेटी दरम्यान राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी "महाराष्ट्रात संरक्षण उत्पादनाशी संबंधित गुंतवणुक करणाऱ्या ब्रिटीश कंपन्यांना सहकार्य करण्यात येईल" असे प्रतिपादन केले हे खरे आहे.

(२) ब्रिटीश कंपन्यांचे संरक्षण उत्पादनाशी संबंधित गुंतवणुकीबाबतचे कोणतेही प्रस्ताव शासनास अदयाप प्राप्त झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्याच्या कांद्याला अनुदान व योग्य भाव मिळण्याबाबत**

**(३०) * ३१०२० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरिशभाई पटेल : तारांकित प्रश्न क्रमांक २२७५९ ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालूवर्षी कांदा पिकाच्या दरात सातत्याने होत असलेली घसरण, कांदा शेतीसाठी रासायनिक खते व आंतर मशागत, कांद्यावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून औषधांच्या तीन-चार कराव्या लागणाऱ्या फवारण्यांवर होणारा खर्च, अवकाळी पाऊसामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत असून तसेच, खटाव (जि.सातारा) तालुक्यातील उत्तर भागात शेकडो ट्रक कांदा अद्यापही पडून असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असल्याचे दिनांक २३ मे, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी प्रति किलो १ रुपये अनुदान देण्याचा निर्णय दहा महिन्यापूर्वी घेऊनही अद्याप शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांद्याला योग्य भाव मिळावा यासाठी शासनाने कांद्याची रुपये १० किलो या दराने खरेदी करणे, काद्यांला प्रति किलो ५ रुपये अनुदान देणे आणि नाशिक जिल्हयातून देशभर कांदा पुरविण्यासाठी रेल्वेने पुरेशा वॅगन द्याव्यात अशी सूचना शेतमाल बाजार अभ्यासक श्री.राजेंद्र जाधव यांनी केल्याचे दिनांक ८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) राज्यातील ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केली आहे. त्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- व २०० क्विंटल प्रति शेतकरी अनुदान देण्यासाठी रुपये ४३.४८ कोटी निधी शासन निर्णय, दिनांक ३/७/२०१७ अन्वये आकस्मिकता निधीमधुन उपलब्ध करुन वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) नाही.

तथापि, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य दर मिळावा यासाठी अन्य राज्यात कांदा पाठविण्यासाठी जादाच्या रेल्वे वॅगन व रॅक्स उपलब्ध करुन दिल्या आहेत.

त्याचबरोबर केंद्र शासनास वेळोवेळी विनंती करुन भारत व्यापारी माल निर्यात योजना (Merchandise Exports from India Scheme) योजनेचा कालावधी वाढवून घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अपंग व्यक्ती अधिनियमाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(३१) * ३२११९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंग व्यक्ती अधिनियमाची अंमलबजावणी होत नसल्याने अपंगांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार राज्यात अपंग व्यक्ती अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता स्वतंत्र अपंग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या अपंग व्यक्तीसाठीच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या योजनांची अंमलबजावणी अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे. तसेच प्रस्तूत अधिनियमातील विविध तरतुदींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित विभागांमार्फ़त करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतीसाठी १२ तास वीज पुरवठा देण्याबाबत**

**(३२) * ३१४९१ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २९१०९ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसा १२ तास अखंड वीज पुरवठा देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी मी मुख्यमंत्री बोलतोय या कार्यक्रमात माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाची अंबलबजावणी न करता यवतमाळ तसेच राज्यातील इतर जिल्ह्यात माहे एप्रिल ते जून या महिन्यात दिवसा भारनियमन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता भारनियमन करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यात कृषीपंपाना सोलार फिडरव्दारे दिवसा १२ तास अखंड वीज पुरवठा देण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी "मी मुख्यमंत्री बोलतोय" या कार्यक्रमात केली आहे.

(२) सदर घोषणेच्या अनुषंगाने शासनाने "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी" ही नवीन योजना जाहीर केली आहे. सदर योजनेंतर्गत राज्यात कोळंबी, जि.यवतमाळ व राळेगणसिध्दी जि.अहमदनगर या दोन ठिकाणी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व इतर मागण्याबाबत**

**(३३) * ३१३०३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, नापिकी, शेतमालास हमीभाव, बँकांकडून कर्ज न मिळणे, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी न होणे, नाशिक जिल्ह्यात मागील १५ महिन्यात १०८, देवठाणा (ता.मंठा, जि.जालना) येथील एक आणि राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या या विरोधात अहमदनगर व वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सुमारे ३० गावातील शेतकऱ्यांनी पेरण्या थांबविण्याचा केलेला निर्धार, आडगाव सरक (ता.जि. औरंगाबाद) येथील शेतकऱ्याने घराला कुलप व चूल बंद ठेवून मंदिरासमोर माहे एप्रिल, २०१७ मध्ये केलेले आंदोलन तसेच राज्यात शेतकऱ्यांनी दिनांक १ जून, २०१७ रोजीपासून राज्यव्यापी संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपामुळे भाजीपाला, दूध व इतर शेतमाल पुरवठ्यावर झालेला परिणाम तसेच संपात सहभागी शेतकऱ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमारात अनेक शेतकरी गंभीर जखमी झाल्याने तसेच शेतकऱ्यांना संपुर्ण कर्ज माफी देऊन त्यांचे ७/१२ कोरे करावेत अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ७ जून, २०१७ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अल्प व मध्यम भुधारक शेतकऱ्यांची कर्जे माफ करुन पेरणीसाठी रुपये दहा हजार उचल देण्याचा निर्णय दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याने या निर्णयाचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळणार आहे, यासाठी किती निधीची तरतूद करण्यात येणार आहे तसेच उर्वरीत कर्ज थकबाकीदार शेतकऱ्यांची संख्या किती आहे व त्यांचे कर्ज माफीसाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०६/२०१७ अन्वये रूपये १०,०००/- च्या मर्यादेपर्यंत तातडीने कर्ज देण्याच्या निर्णयाचा लाभ थकबाकीदार सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. यासंदर्भात निधीबाबत शासनाची हमी संबंधित बँकांना देण्यात आली आहे.

राज्यातील थकबाकीदार शेतकरी व इतर प्रोत्साहनपर लाभ मिळणारे शेतकरी सुमारे ८९ लाख असून त्यासाठी एकूण अंदाजे रूपये ३४०२२ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती सुलभ करण्याबाबत

**(३४) * ३१३४० ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७३२९ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक प्रवेश व शासकीय-निमशासकीय नोकऱ्यांसाठी आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास अनेक अडचणी येत असल्याने तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती रोखल्या जात असल्याने सुमारे ८० हजारपेक्षा अधिक प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित असल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या सध्याच्या पध्दतीत बदल करुन कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यानुसार सुलभीकरणाचा प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, जात प्रमाणपत्रासाठी सन १९५० च्या वास्तव्याचा दाखला आवश्यक नसून वडिलांच्या वा रक्ताचे नातेवाईकांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे अर्जदारास जात प्रमाणपत्र देण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांनी सन २०१७ चे अर्थसंकल्पिय अधिवेशनात सभागृहात घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ३ महिन्याचा कालावधी होऊनही त्याबाबतचा शासन निर्णय अद्याप निर्गमित न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

राज्यातील जिल्हानिहाय समित्यांकडे माहे मे, २०१७ अखेर एकूण ८५६३० प्रकरणे प्रलंबित होती. अर्जदार कागदपत्रे सादर करू न शकल्याने त्यापैकी ४२५०८ प्रकरणे त्रुटीची आहेत. प्रत्यक्षात समित्यांकडे ४३१२२ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) या संदर्भात मंत्री (सा.न्याय) यांचेकडे वेळोवेळा बैठका घेण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यपद्धती सुलभ करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

जातीचा दाखला दिल्यानंतर जात प्रमाणपत्राची पडताळणी करतांना वडिलांकडे जातीचा दाखला असेल व वडिलांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असेल तर रक्ताच्या नात्यातील प्रत्येक व्यक्तीला जातीचा दाखला दिला जाईल व त्याची पडताळणी देखील करून दिली जाईल असे निवेदन केले होते.

(४) मागासवर्गीयांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी रक्त संबंधातील नातेवाईकांकडील वैधता प्रमाणपत्राआधारे अर्जदारांना जातीची प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे देताना अर्जदाराचे इतर कागदोपत्री पुरावे तपासणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील अधिकृत अभिलेख्यांचे जतन करून ते संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला संदर्भासाठी उपलब्ध करणे याविषयी तपासणी करून, कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात नक्षलग्रस्त भागात बेकायदेशीर भारनियमन होत असल्याबाबत

**(३५) * ३०८९४ श्री.हरिसिंग राठोड, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर व यवतमाळ येथील नक्षलग्रस्त तसेच इतर भागात दिनांक ४ मे, २०१७ पासून बेकायदेशीररित्या भारनियमन करीत असल्याने वीज ग्राहकात असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली, चंद्रपूर व यवतमाळ येथील काही भागात कोणत्याही परिस्थितीत भारनियमन करू नये व केल्यास त्याची पूर्वसूचना देणे बंधनकारक असताना कोणतीही पूर्व सूचना न देता बेकायदेशिररित्या भारनियमन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) माहे एप्रिल, २०१७ मध्ये तापमानातील बदलांमुळे विजेच्या मागणीत झालेली वाढ व तांत्रिक कारणास्तव उपलब्धतेत झालेली घट यामुळे राज्यात दिनांक २७/०४/२०१७ ते ०६/०५/२०१७ पर्यंत भारनियमन करण्यात आले होते. दिनांक ०७/०५/२०१७ पासून विजेच्या कमतरतेच्या कारणास्तव कुठेही भारनियमन करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये अग्निशमन दलाची स्थापना करण्याबाबत**

**(३६) * ३२८२७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात आसनगाव, आदगांव, वासिंद, पुणधे, खर्डी येथील परिसरात औद्योगिक वसाहतीचे विस्तीर्ण जाळे पसरलेले असून यामध्ये लिबर्टी, ऑईल मिल, इंटरकुल, ग्लोबल, जिंदाल असे मोठे उद्योग समुह असतानाही याठिकाणी अग्निशमन दल नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीत मोठी दुर्घटना घडल्यास जिवीत तसेच वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करुन सदर वसाहतीत अग्निशमन दल स्थापन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) शहापूर नगरपंचायत दिनांक १३/०६/२०१५ रोजी स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान दिनांक ३१/०८/२००९ पासून राबविण्यात येत आहे. सदर अभियानातंर्गत निधी वितरीत करताना त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर सुमारे २० चौ.कि.मी. परिसरात अग्निशमन सेवा देणे बंधनकारक आहे. सदर अभियान नव्याने निर्माण झालेल्या/होणाऱ्या "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायती मध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी बहुल गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(३७) * ३१०११ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पालघर, ठाणे, रायगड आणि नाशिक जिल्हयातील आदिवासी बहुल गावांमध्ये मुलभूत नागरी सुविधांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाने संवेदनशीलतेचे धोरण ठरविण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांसोबत श्रमजीवी संघटनेचे संस्थापक व कार्यकर्ते यांची दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून राज्यातील आदिवासींच्या मुलभूत प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी संवेदनशील धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) सदर विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचेस्तरावर दिनांक ०३/०५/२०१७ रोजी बैठक झाली तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांना श्रमजीवी संघटनेने दिलेले दिनांक २२/०३/२०१७ चे निवेदन या विभागास दिनांक २८/०३/२०१७ रोजी प्राप्त झाले आहे. सदर निवेदनातील मागण्या विविध विभागांशी संबंधित असल्याने विभागाच्या दिनांक ०५/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मद्यप्राशन कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३८) * ३२३१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मद्यप्राशनासाठी वयाचे बंधन घालणारा कायदा शासनाने केलेला असला तरी कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसून हॉटेल, बार, मद्यविक्रीची दुकाने इ. ठिकाणी कुठेही मद्य देताना वा विक्री करताना घेणाऱ्याचे वय किंवा तो मद्य घेण्यासाठी पात्र आहे किंवा नाही इ. बाबी तपासल्या जात नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंटच्या अभ्यासक्रमानुसारही वयाच्या १५ व्या वर्षाआधी मद्यप्राशन केलेल्या तरुण-तरुणींच्या संख्येत वाढ झाली असून काही राज्यात मद्यप्राशनासाठी आवश्यक वय हे १८ तर काही राज्यात २१ वर्षे असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र वगळता सर्व राज्यात एकच वय असल्याने वयाबाबत असलेली संदिग्धता दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंटच्या अभ्यासक्रमानुसारही वयाच्या १५ व्या वर्षाआधी मद्यप्राशन केलेल्या तरुण-तरुणीच्या संख्येत वाढ झाल्याबाबतची माहिती विभागाकडे नाही तथापि काही राज्यात मद्य प्रशासनासाठी आवश्यक वय १८ तर काही राज्यात २१ वर्ष आहे.

(३) मद्यप्राशनासाठी वय कमी करण्याचे शासनाचे कोणतेही धोरण विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निफाड (जि. नाशिक) तालुक्यातील रस्त्यांची कामे महाराष्ट्र खनिज विकास निधीमधून करण्याबाबत

**(३९) * ३०९४६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खनिज विकास निधीमधून निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना निधी मिळण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसिलदार, निफाड यांचेकडून मागविलेली माहिती माहे जून, २०१७ पर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) प्रस्तुत विषयी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ता.निफाड जिल्हा-नाशिक मधील रस्त्यांची कामे खनिज विकास निधीमधून घेता येतील किंवा कसे ? याबाबत तालुकांतर्गत गौण खनिजांचा महसूलाचा तपशिल व प्रस्तावित रस्त्यांची वाळू खाणींपासूनचे अंतर यांचा तपशिल दिनांक ०१/०९/२०१६ च्या पत्रान्वये मागवला होता.

(२) व (३) मागील ३-४ वर्षापासून निफाड तालुक्यातील एकही वाळूस्थळाचा लिलाव गेलेला नसल्याने तसेच तालुक्यातील बहुतांश दगडखाणी बंद असल्याने सदरची माहिती सादर केली नसल्याचे तहसिलदार, निफाड यांनी दिनांक ०६/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे. निफाड तालुक्यात सद्य:स्थितीत २ दगडखाणी सुरू आहेत. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, खाण व खनिजे सुधारित अधिनियम, २०१५ च्या कलम ९ ब च्या तरतुदीनुसार शासन अधिसूचना दिनांक ०१/०९/२०१६ अन्वये राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. यास्तव पुर्वीच्या महाराष्ट्र खनिज अधिनियम, २००१ निरसित करण्यात आला आहे. खाणबाधित परिसराचा विकास करण्याकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठान नाशिक यांच्याकडे पुर्वीचे अर्ज/ प्रस्ताव अग्रेषित करणेबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**राज्यातील सावकाराकडील शेतकऱ्यांच्या गहाण जमिनी परत करण्याबाबत**

**(४०) * ३२१४८ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः विदर्भातील यवतमाळ, वाशिम, अकोला व बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांची ३ हजार एकर जमीन सावकाराकडे कर्जापोटी गहाण असल्याचे दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुडाणा (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील दिव्यांग शेतकरी प्रकाश जाधव याने गहाण ठेवलेल्या ५ एकर शेतीवरील रूपये १ लाख कर्जावरील रूपये ५ लाख इतक्या रक्कमेची परतफेड करूनही सावकाराने त्याची शेती परत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (१) प्रकरणी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळणे व प्रश्न भाग (२) मधील सावकारावर कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) यवतमाळ जिल्हयातील अर्जदार श्री.प्रकाश भिकु जाधव यांनी सहकार अधिकारी, श्रेणी-१ सहकारी संस्था, महागांव यांच्याकडे सावकार श्री.लक्ष्मणराव देवकते यांचेविरूध्द तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहकार अधिकारी, श्रेणी-१ सहकारी संस्था, महागांव यांच्याकडे चौकशी सुरू असून संबंधिताचे जबाब नोंदविण्याची कार्यवाही सुरू आहे.

यापूर्वी श्री.लक्ष्मणराव देवकते या सावकारांविरूध्द प्राप्त झालेल्या तक्रारीवरून सहकार अधिकारी, श्रेणी-१ सहकारी संस्था, महागांव यांनी संबंधित सावकाराच्या घरावर दिनांक १६/१२/२०१६ रोजी धाडसत्र राबवून कार्यवाही केली. सदर कार्यवाही दरम्यान श्री.देवकते हे अवैध सावकारी करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर सावकाराविरूध्द दिनांक २९/०३/२०१७ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण आपल्यादारी या योजनेनुसार औरंगाबाद परिमंडळातील प्रलंबित शेतकऱ्यांना वीज जोडण्या देण्याबाबत

**(४१) * ३२१७० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २८९०९ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महावितरण परिमंडळातील औरंगाबाद ग्रामीण भागासाठी ८५०० नवीन वीज जोडण्या व पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील १७०० शेतकऱ्यांनी महावितरण आपल्यादारी या योजनेत वीज जोडणी मिळण्याबाबत अर्ज सादर करूनही त्यांना माहे मे, २०१७ पर्यंत वीज जोडणी व साहित्य पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पाण्याअभावी पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करण्याचे आदेशाची अंमलबजावणी न होणे तसेच वीज जोडणी दिलेली नसतांना नियमबाहयरित्या वीज देयके देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित जोडण्या व गाव पातळीवर शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) औरंगाबाद ग्रामीण मंडळांतर्गत "महावितरण आपल्या दारी" या योजनेंतर्गत एकूण १२८२५ कृषीपंप ग्राहकांना केबलव्दारे वीज जोडण्या देण्यात आलेल्या असून सदर कृषीपंपांना आवश्यक असणारी पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित आहेत. तसेच, औरंगाबाद परिमंडळामध्ये माहे मार्च, २०१७ अखेर ७९०६ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते.

(२) औरंगाबाद परिमंडळामध्ये कृषीपंप ग्राहकांना दिनांक ८/९/२०१६ ते १५/१२/२०१६ पर्यंत १२ तास वीज पुरवठा देण्यात आला आहे. मात्र काही वाहिन्या अतिभारीत असल्यामुळे त्या वाहिन्यांवरील कृषीपंपाना ८ ते १० तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(४२) * ३१२०० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.संजय दत्त, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.विक्रम काळे, श्री.आनंदराव पाटील तारांकित प्रश्न क्रमांक २६७६५ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्यभरात सातत्याने आंदोलन होत असल्याने दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. उच्च न्यायालयात यासंदर्भातील जनहित याचिकेच्या सुनावणीच्या दरम्यान मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा राज्य मागासवर्ग आयोगाकडे मांडण्याचे राज्य शासनाने मान्य केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठा आरक्षणासंदर्भातील कागदपत्रे राज्य मागासवर्ग आयोगाकडे सादर करावीत किंवा नाही याबाबत शासन कोणतीच ठोस भूमिका घेत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोगाने नाशिक जिल्हयामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयात इतर १३ जातीच्या आरक्षणाच्या मागणीवर सुनावणी घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या निर्णयासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४ मे, २०१७ रोजी सूचित केल्यानुसार मराठा आरक्षणाबाबत संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे तपासणीसाठी पाठविण्याबाबत शासनाने मान्य केले आहे.

(२) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४ मे, २०१७ रोजीच्या आदेशामध्ये मराठा आरक्षणाबाबत संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्याबाबत राज्य शासनाने स्वतःच्या अधिकार क्षेत्रात निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे शासनाने मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण स्पष्ट करणे ऐतिहासिक पुरावे, संदर्भ इत्यादी सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाची विभागवार सुनावणी नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी नाशिक विभागांतर्गत प्रलंबित असलेल्या १४ जाती समूहाचे प्रतिनिधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नाशिक येथे सुनावणीस हजर होते.

(४) सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे. याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाचा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

----------------

## घाटेमाल धनगरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथे विद्युत पुरवठा करण्याबाबत

**(४३) * ३२५०७ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घाटेमाल धनगरवाडी येथे स्वातंत्र्याच्या ६७ वर्षानंतरही विद्युत पुरवठा नसल्याने तेथील ग्रामस्थ अंधारमय जीवन जगत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची शासनस्तरावर पूर्तता होवूनही माहे मे, २०१७ मध्ये ७ महिने पूर्ण होवूनही सदर गावात अद्यापपर्यंत वीज पुरवठा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटेमाल धनगरवाडी येथे विद्युत पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घाटेमाल धनगरवाडी येथे विद्युत पुरवठा करण्यासाठी लघुदाब वाहिनीचे काम जिल्हा योजनेंतर्गत दिनांक ३/५/२०१७ रोजी पूर्ण झाले आहे. घाटेमाल धनगरवाडी येथे दिनांक ६/५/२०१७ रोजीपासून वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी पेठ (जि.पुणे) येथील वसतिगृहातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याबाबत

**(४४) * ३२३५३ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी पेठ (जि.पुणे) येथील अहिल्या शिक्षण मंडळाच्या वसतिगृहात धनगर समाजाच्या मुलांना प्राधान्याने राहण्यास देण्याची तरतूद असतानाही येथे धनगर मुलांना वसतिगृहाबाहेर काढून त्यांच्यावर विश्वस्थांकडून अन्याय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी धर्मादाय आयुक्तांकडे तक्रारी प्राप्त होऊनही संबंधितांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी व जागेचा होत असलेला गैरवापर रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक ०२ जानेवारी, २०१७ रोजी श्री.अर्जुन तुकाराम झंजे व श्री.रमेश गोफणे यांनी अहिल्या शिक्षण मंडळाच्या वसतिगृहात धनगर समाजाच्या मुलाना प्राधान्याने राहण्याची तरतूद असतानाही येथे धनगर मुलांना वसतिगृहाबाहेर काढून त्यांच्यावर विश्वस्थांकडून अन्याय होत असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याद्वारे याप्रकरणी चौकशीसाठी निरीक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. (चौकशी क्र.१५५/२०१७) याबाबत चौकशीचे काम सुरु असून श्री.झंजे, श्री.गोफणे यांचे जबाब नोंदविण्यात आलेले आहेत. न्यासाचे दप्तर तपासणी त्याचप्रमाणे विश्वस्तांचा जबाब नोंदविण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

## ‘अब्दुल कलाम अमृत आहार’ योजना निधी अभावी बंद झाल्याबाबत

**(४५) * ३२३१८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्तनदा, गरोदर माता आणि कुपोषित मुलांना आठवडयातुन एकदा अतिरिक्त आहारात दूध, अंडी, सुका मेवा यासारख्या प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असलेली ‘अब्दुल कलाम अमृत आहार’ योजना १६ जिल्हयांमध्ये सुरु करण्यात आली परंतु अपुरा निधी, शासकीय यंत्रणेचा आणि समन्वयाचा अभाव असल्याने सदर योजना बंद करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१७ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना ठाणे, रायगड, पालघर जिल्हयात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आली असून कर्जत तालुक्यातील ४७ गावांमध्ये माहे मे, २०१७ मध्ये योजनेची सुरुवात होऊन अवघ्या दोन आठवडयात ही योजना बंद पडली आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यात कुपोषितांच्या आहारासाठी सुरु केलेल्या ‘अब्दुल कलाम अमृत आहार’ योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन सदर योजना पूर्ण क्षमतेने चालावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १६ जिल्हयांमध्ये कार्यरत आहे. तसेच, सदर योजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १७०.८४ कोटी इतका निधी दिनांक १८ मे व २० मे, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर जिल्हयांमध्ये योजना सुरु झाल्यापासून नियमितपणे राबविण्यात येत आहे. तसेच, कर्जत तालुक्यातील ४७ गावांमध्ये भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना माहे ऑक्टोंबर, २०१६ पासून सुरु असून सद्यस्थितीमध्ये सदर योजना योग्यरित्या राबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शासकीय गोदामांची संख्या वाढविण्याबाबत**

**(४६) * ३०९१७ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची कृषी उत्पन्नाची क्षमता चांगली असताना त्या उत्पादनाची सुरक्षा व योग्य साठा करण्याची व्यवस्था नसून राज्यात केवळ १,०२४ गोदामे असल्याने कृषी उत्पादनाच्या तुलनेने गोदामांची संख्या ही अत्यंत कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शासकीय गोदामांची संख्या वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे,

सन २०००-२०१४ या कालावधीत रुपये १७८.७५ कोटी खर्च करुन १९२ गोदामे बांधण्यात आली आहेत. तथापि, गोदामांची निकड लक्षात घेऊन सन २०१४-२०१७ या कालावधीत रुपये १०९.३६ कोटी खर्चुन ३९ गोदामे बांधण्यात आली आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळास राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०१६ मध्ये विदर्भात गोदाम उभारणीकरिता रुपये ९.२२ कोटी अनुदान प्राप्त झाले आहे.

महामंडळाकडील ४,२३,००० मे.टन साठवणूक क्षमता वापरतांना शास्त्रोक्त साठवणूकीसाठी अडचणी येत असल्याने, महामंडळाच्या गोदामांचे उन्नतीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (RKVY) आणि महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत अनुक्रमे रुपये ४६.१९ कोटी आणि रुपये ३१.३२ कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सन २०१७-१८ मध्ये RKVY अंतर्गत गोदाम उभारणीकरिता RKVY कडून रुपये २२.५० कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले असून, महामंडळ रुपये २५.४३ कोटी खर्च करणार आहे.

----------------

**औरंगाबाद येथील कार्यालयातील जात पडताळणीची मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत**

**(४७) * ३२४०४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील जात पडताळणी समितीकडे नागरिकांकडून देण्यात येणारे जात पडताळणी संदर्भातील अनेक मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात पडताळणीचे मूळ कागदपत्रेच गहाळ झाल्याने संबंधित नागरिकांच्या मुलांना जातीचे प्रमाणपत्र मिळणे अशक्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) खरे नाही.

समिती कार्यालयामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या जाती प्रवर्गातील शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर प्रयोजनासाठी प्राप्त झालेली प्रकरणे समितीमार्फत तपासून, पडताळणी करून निर्णय घेण्यात येतो व त्यामध्ये वैध ठरलेल्या प्रकरणातील अर्जदारास जात वैधता प्रमाणपत्र व त्यांनी सादर केलेला मूळ जातीचा दाखला त्यांना परत करण्यात येतो. तथापि, माहे नोव्हेंबर, २०१६ पासून जिल्हा निहाय समित्या कार्यान्वित झाल्याने तत्कालीन विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१ औरंगाबाद समितीच्या अंतर्गत असलेल्या जिल्हयातील प्रलंबित प्रकरणांच्या संचिका ह्या त्या त्या जिल्हास्तरीय समितीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. संचिका गहाळ झाल्याविषयी समिती कार्यालयास अद्यापपर्यंत अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी/निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण, महानिर्मिती व महापारेषण मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबत

**(४८) * ३१९७१ डॉ.अपूर्व हिरे, ॲड.राहुल नार्वेकर : दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक २५७५३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा व अनुभव विचारात घेता त्यांना शासकीय सेवेत नियमित करण्यासाठी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) महानिर्मिती यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालावरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषणमध्ये सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून न घेतल्यामुळे त्यांनी दिनांक २२ मे, २०१७ रोजीपासून बेमुदत संपावर जाण्याची रितसर नोटीस तीनही कंपन्यांसह ऊर्जा मंत्री यांना दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विचाराधीन अहवालावरील शासनाचा विचार केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर अहवालातील शिफारशींबाबत संबंधित विभागाशी विचारविनिमय सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील वडाळा (पूर्व) येथे हायटेन्शन वायरचा स्फोट झाल्याबाबत

**(४९) * ३१७१० श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा (पूर्व) येथील गणेशनगर दुधवाला गल्लीत हायटेन्शनचा वायरचा स्फोट होवून तीन घरे पूर्णत: उध्वस्त व एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) गणेश नगर, वडाळा (पूर्व) येथे दिनांक २४/४/२०१७ रोजी रात्री १ वाजताच्या सुमारास टाटा पॉवर कंपनीची ईएचव्ही लाईन ट्रीप होऊन फ्लॅश ओव्हर झाल्यामुळे तीन घराचे नुकसान झाले आहे. सदर घटनेची चौकशी दिनांक २६/४/२०१७ रोजी विद्युत निरीक्षक, मुंबई निरीक्षण विभाग, मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात आली. त्यांच्या माहितीनुसार श्री. सुनिल शंकर थळे, गणेश नगर, सॉल्ट पॅन रोड, ॲन्टॉप हिल, मुंबई यांनी स्वत:च्या घरावर अनधिकृतपणे एक मजला बांधलेला आहे. त्यामुळे त्यांच्या घरावरून जाणाऱ्या टाटा पॉवर कंपनीच्या ११० केव्ही ट्रान्समिशन लाईनचे अंतर कमी झाले. श्री. एजाज अनिस अन्सारी चोरी करण्याच्या उद्देशाने दिनांक २४/४/२०१७ रोजी मध्यरात्री १.०० च्या सुमारास श्री.सुनिल शंकर थळे यांच्या घराच्या छतावर चढले असता घरावरून जाणाऱ्या टाटा पॉवर कंपनी लि. च्या ट्रान्समिशन लाईनच्या अर्किंग झोन (Arcing Zone) मध्ये आल्याने फ्लॅश ओव्हर होऊन सदर अपघात झाला. त्यामध्ये श्री.अन्सारी स्वत: भाजले गेले व आगीच्या ज्वालांमुळे घराच्या पत्र्याचे छत कोसळून घरामध्ये झोपलेली इतर चार माणसेही भाजली गेली. भाजलेल्या सर्व लोकांना के.ई.एम. रुग्णालयात नेण्यात आले. त्यापैकी श्री.एजाज अन्सारी यांचा दिनांक २६/४/२०१७ रोजी मृत्यू झाला असून इतर चार लोकांना उपचाराअंती घरी सोडण्यात आले आहे.

विद्युत निरीक्षक, मुंबई निरीक्षण विभाग, मुंबई या कार्यालयाने दिनांक २८/४/२०१७ च्या पत्रान्वये घरमालक श्री.सुनिल शंकर थळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंडीपार व हिरडामाली (जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांना जमिनी संपादनाकरीता नोटीस देण्यात आल्याबाबत

**(५०) * ३३३०३ श्री.परिणय फुके, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंडीपार व हिरडामाली (जि.गोंदिया) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने येथील शेतकऱ्यांच्या शेतातील ६६ के.व्ही व त्यापेक्षा उच्च दाब मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचे जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने शासनाच्या प्रचलित दरपत्रकाप्रमाणे मूल्यांकन करून, येणाऱ्या मूल्यांकनाच्या दुप्पट मोबदला देण्याचा निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजीच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१६/प्रा.क्र.५२/उर्जा-४ नुसार घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयानुसार शेतकऱ्यांना देण्यात येणारा १५ % मोबदला हा अत्यल्प स्वरुपाचा तसेच शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांनी यास विरोध करुन संबंधित भागातील प्रचलित शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे दुप्पट अथवा त्यापेक्षा अधिक मोबदला देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी प्रती टॉवर रुपये १० लाख मिळावे अशी मागणी केली असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) वीज पारेषण वाहिनी व मनोरा उभारण्याकरिता जमीन संपादित केली जात नाही. तथापि, सदर वाहिनीचे काम करण्यासाठी भारतीय टेलीग्राफ ॲक्ट, १८८५ मधील तरतुदीनुसार संबंधीत जमीनधारकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

(२) निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) संबंधित १३२ के.व्ही. गोंदिया-हिरडामाली वाहिनी उभारण्याचे काम रेल्वे विभागाचे असून ते केवळ महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्यात येत आहे. वीज पारेषण वाहिनी उभारण्याकरिता जमिनधारकांनी विरोध केल्यामुळे महापारेषण कंपनीने जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांच्याकडे भारतीय टेलीग्राफ ॲक्ट १८८५ चे

कलम १६ (१) अंतर्गत अपिल दाखल केले होते. सदर अपिलांवर जिल्हादंडाधिकारी यांनी सुनावणी घेवून सदरचे काम करण्याबाबत व नियमानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंगाने रेल्वे विभागातर्फे नुकसान झालेल्या पिकांच्या व फळझाडांच्या १०४ प्रकरणी संबंधितांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला देण्यासाठी कंपनीकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात आदिवासी युवक व युवतींना "आचारी प्रशिक्षण" देणाऱ्या यशवंत मानव विकास प्रशिक्षण बहुउद्देशिय संस्थेने गैरव्यहार केल्याबाबत**

**(५१) * ३०८८९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.हरिसिंग राठोड, श्री.परिणय फुके, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भ-मराठवाडयातील १३ जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या अमरावती आदिवासी विकास विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या साडेचार कोटींची आर्थिक तरतूद असलेल्या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात आदिवासी युवक व युवतींना आचारी प्रशिक्षण देण्याकरीता यशवंत मानव विकास प्रशिक्षण बहुउद्देशिय संस्थेकडे कौशल्य धडे म्हणून प्रशिक्षण देण्याची जबाबदारी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडरचे (व्हीटीपी) रजिस्ट्रेशन असलेल्या संस्थांनाच प्रशिक्षणाचे हे कंत्राट देणे बंधनकारक असतांना रजिस्ट्रेशन नसलेल्या व त्या कार्यालयाच्या मर्जीतील नागपूरच्या संस्थांना नियम डावलून कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथील या संस्थांनी तसेच औरंगाबाद येथील जाणता राजा मल्टिपर्पज चॅरिटेबल ट्रस्टने प्रत्यक्ष प्रशिक्षण न देता प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ४७ हजार २०५ प्रमाणे १०० आदिवासींची कागदोपत्री प्रशिक्षण दिल्याची नोंद करून कोट्यवधी रूपयाचा गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनास विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत सन २०१३-१४ करीता दिनांक ०६/०६/२०१३ रोजीच्या शासन पत्रान्वये यशवंत मानव विकास प्रशिक्षण बहुउद्देशिय संस्थेकडून प्राप्त प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता प्रदान केली आहे. सबब, सदर योजनेची अंमलबजावणी या संस्थेमार्फत करण्याबाबत योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचनांना दिनांक २७/११/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही,

तथापि, याबाबत दिनांक २५/४/२०१७ व २६/४/२०१७ रोजीच्या दैनिक लोकमतच्या अमरावती आवृत्तीमध्ये बातमी आली आहे.

(४) या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ०२/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सावकारांकडून शेतकरी व व्यापाऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(५२) * ३२४६३ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सततचा दुष्काळ, शेत मालाचा पडलेला भाव इ. कारणांमुळे शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून सन २०१५ मध्ये रुपये ८९४ कोटी व सन २०१६ मध्ये १० लाख ५६ हजार शेतकरी आणि व्यापाऱ्यांना रुपये १ हजार ५९४ कोटीचे कर्ज दिल्याचे राज्याच्या आर्थिक पहाणीच्या अहवालातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे सावकार गरीब गरजू लोकांना १० ते २५ टक्के शेकडा व्याजाने रक्कम देऊन केवळ १० महिन्यातच दुप्पट रक्कम घेत असणे तसेच राज्यातील ग्रामीण भागात खाजगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज हे कर्जाच्या अनेक पटीने जास्त असल्याचा दावा तज्ञांनी केला असून विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : एमएलए/१०१५/ प्र.क्र.२५/७/७/स, दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयातील १(३) सावकारी क्षेत्रासंबंधीची अट शिथील करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम ४ मध्ये बदल करण्याबाबत सहकार आयुक्त कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेवून शेतक-यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्याबाबत व सावकारांवर व्याज आकारण्याचे बंधन ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय खरे आहे.

(२) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यामध्ये अशा प्रकारची बाब निदर्शनास आली नाही.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३१ अन्वये सावकारांवर व्याज आकारण्याचे बंधन ठेवण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने शासन अधिसुचना दिनांक १६ सप्टेंबर २०१४ अन्वये सावकाराने आकारावयाच्या अधिकतम व्याजाचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५३) * ३२४३८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तूर, कांदा, द्राक्ष व डाळिंब यांच्याबरोबरच मोसंबीच्या दरातही ४० हजाराहून चार हजार प्रतिटन इतकी घट झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या महिन्यात द्राक्ष उत्पादनाला निर्यातीच्यावेळी उत्पादन खर्चाच्या निम्म्यापेक्षाही कमी दर मिळाले असल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, तसेच मोसंबीचे दर कमी झाल्याने उस्मानाबाद जिल्हयातील ८५ हेक्टरवरील उत्पादक शेतकऱ्यासह, मराठवाडयातील मोसंबी उत्पादक आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील चार वर्षापासून दुष्काळी परिस्थितीमुळे तसेच पाण्याअभावी अनेक शेतकऱ्यांच्या बागा बंद झाल्या असून जिल्हयात केवळ ८५ हेक्टर बागा शिल्लक राहिल्या आहेत, हे ही खरे ओह काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त द्राक्ष व मोसंबी बागायतदार शेतकऱ्यांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) मागील ५ वर्षातील द्राक्षे, डाळींब व मोसंबीचे दर पुढीलप्रमाणे आहेत :-

| वर्ष | द्राक्षे | डाळींब | मोसंबी |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ३५८९ | ४६६८ | १८६४ |
| २०१३-१४ | ३२२८ | ४६११ | १९८२ |
| २०१४-१५ | ३३०५ | ४२४१ | २१८६ |
| २०१५-१६ | ३७२० | ४१५१ | २८२३ |
| २०१६-१७ | ४०८३ | ४०६३ | २८७३ |

(२) व (३) सन २०१६-१७ Grapenet वर नोंदणीकृत झालेल्या ३२००० शेतकऱ्यांकडून १.५६ लाख मे.टन द्राक्षेची निर्यात झालेली आहे. द्राक्षे निर्यात केलेल्या देशांना मोठ्या प्रमाणात द्राक्षे पाठविल्याने व अन्य देशातूनही द्राक्षे आल्याने द्राक्षासाठी दर कमी मिळाले आहेत.

उस्मानाबाद जिल्हयामध्ये सन २०१५-१६ मध्ये मोसंबी उत्पादनाखाली असणाऱ्या फळबागांचे क्षेत्र ७५ हेक्टर असून, लागवडीखालील फळबागांचे क्षेत्र १८.५० हेक्टर आहे. तथापि, २०१३-१४ पासून लागवड केलेल्या मोसंबी बागा अद्याप फळावर आलेल्या नाहीत.
(४) नाही. तथापि शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी योग्य भाव मिळावा यासाठी बाजार समिती यार्डाच्या बाहेर फळे व भाजीपाल्यांचे नियमन मुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

तसेच शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संत श्री.सावता माळी शेतकरी आठवडा बाजार योजना सुरु करण्यात आली असून, राज्यात जवळपास ११० ठिकाणी आठवडा बाजार सुरु करण्यात आले आहेत.

तसेच नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील परळी वैजनाथ तसेच इतर औष्णिक विद्‌युत केंद्रातील बंद संच सुरु करण्याबाबत

**(५४)* ३१०२५ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरिशभाई पटेल, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कडक उन्हाळयामुळे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता असल्याने महावितरणाची वीजेची मागणी १८ हजार ५०० मेगावॅटपेक्षा जास्त असणे, सुमारे १ हजार १०० मेगावॅटचे संच दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी बंद असणे तसेच कोराडी, परळी, चंद्रपूर, रतन इंडिया, तारापूर, मुंद्रा, अदानी, खापरखेडा इ. ठिकाणचे सुमारे ३ हजार मेगावॉटचे वीजनिर्मिती संच तांत्रिक कारणांमुळे बंद पडल्याने सुमारे ४१०० मेगावॅट विजेचा तुटवडा निर्माण झाल्याने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मोठया प्रमाणावर भारनियमन करावे लागले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारनियमामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व बागायतीचे नुकसान होत असणे तसेच कोयना धरणातून मागील काही महिन्यांपासून बेसुमार पाणी वापर करुन वीज निर्मिती करण्यात आली असली तरी वीजेच्या मागणीत वाढ आणि उपलब्धता कमी झाल्याने खासगी खरेदी प्रक्रियेतून (एक्सेंज) मिळणाऱ्या वीजेच्या किंमतीत वाढ होऊन ती रुपये पावणे तीन प्रति युनिटवरुन रुपये पाच ते साडेपाच प्रति युनिट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोयना धरणातील पाण्याचा बेसुमार वापर रोखणे, भारनियमन कमी करण्यासाठी सदर बंद संच सुरु करणे व वीजेच्या दरावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यात विजेच्या मागणीत झालेली मोठी वाढ व उपलब्धतेत अनपेक्षित घट यामुळे दिनांक २७ एप्रिल ते ०५ मे, २०१७ या कालावधीत काही तासांकरीता (जास्त वीज गळती असलेल्या) अकृषक तसेच कृषक वाहिन्यांवर २ ते ३ तासांकरीता चक्राकार पध्दतीने भारनियमन करावे लागले होते.

(२) देशात आलेल्या उष्णतेच्या लाटेने, पॉवर एक्सेंजमध्ये वाढलेल्या वीज मागणीमुळे आवश्यक वीजेपेक्षा उपलब्ध वीजेमध्ये तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे एक्सेंजवरील वीजदरामध्ये मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात प्रति युनिट अंदाजे रुपये २.५० वरुन रुपये ४.६४ पर्यंत वाढ झाली.

(३) कोळशाच्या उपलब्धतेमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात आले. तसेच महावितरणने व्दिपक्षीय कराराव्दारे ५०० मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घेतली. महावितरण कंपनीने बॅकींग पध्दतीने करार करुन माहे एप्रिल व मे महिन्यामध्ये दिवसा मागणीच्या वेळी २०० ते ३०० मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घेतली. घाटघर विद्युत निर्मिती केंद्राचा प्रभावी वापर आणि आवश्यक त्या काही तासांसाठी पॉवर एक्ससेंजमध्ये ३०० ते १,८०० मे.वॅ. पर्यन्त वीज खरेदी करुन वीजेची तूट भरुन काढण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण-खालापूर-खोपोली मार्गावरील आजिवले ऑक्टा गारमेंट कंपनीस लागलेली आगीबाबत

**(५५) * ३१६५८ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण-खालापूर-खोपोली मार्गावरील बावोशी येथील आजिवले ऑक्टा गारमेंट कंपनीस ट्रान्सफॉर्मरच्या शॉटसर्किटमुळे आग लागल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षात खालापूरातील ११ कारखाने आगीत नष्ट झाले असल्याने विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सदर कारखान्यांना जाणीवपूर्वक आग लावली जात असल्याचा संशय कामगारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व तद्नूसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) आजिवले ऑक्टा गारमेंट या कंपनीस दिनांक १२/४/२०१७ रोजी पहाटे ३.३० वाजता कंपनीच्या चालू असलेल्या टयुबलाईटच्या स्विच बोर्ड मध्ये स्पार्किग होऊन तेथे खाली ठेवलेल्या फोमवर ठिणग्या पडल्यामुळे आग लागली.
(२) मागील तीन वर्षात खालापूर भागात कारखान्यांतर्गत सदोष वीजसंच मांडणीमुळे ५ कारखान्यांना आग लागल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) आजिवले ऑक्टा गारमेंट कंपनीच्या अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग रायगड, पेण यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. मे.ऑक्टा इंडस्टीज, आजीवली गाव, खालापूर, जि.रायगड या कारखान्यास जळालेल्या भागाचे नवीन विद्युत संचमांडणी करण्याकरिता व दोष निवारणाकरिता दिनांक २०/४/२०१७ रोजी विद्युत निरीक्षकांकडून ज्ञापन देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(५६) * ३१३४२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २६७६३ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देणेबाबत सातत्याने मागणी/आंदोलने करण्यात येत असून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये आणि माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवालामध्ये पहिल्या टप्प्यातील फॉरमेटीव्ह संशोधनाच्या प्रगतीची माहिती तसेच प्रस्तावित मुख्य संशोधनांतर्गत भाग -१ व भाग - २ च्या रुपरेषासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यासंदर्भातील मागणीच्या अनुषंगाने संशोधन करणाऱ्या टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई (टीस) या संस्थेचा अहवाल माहे डिसेंबर, २०१७ मध्ये शासनास सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) या दोन्ही अहवालातील शिफारशी काय आहेत व त्यानुसार धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) होय. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांचेकडून मुख्य संशोधनांतर्गत भाग-१ अंतर्गत महाराष्ट्रातील ३६ जिल्हांमधील धनगर समाजाचा सामाजिक व मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास सुरु असून, भाग-२ अंतर्गत झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, ओरिस आणि छत्तीसगड या पाच राज्यांमधील Oraon आणि Dhangad या जमातीचा सामाजिक व मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु असल्याने टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांचेकडून कोणत्याही अंतरिम अहवालाद्वारे कोणत्याही शिफारशी प्राप्त झालेल्या नाहीत. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेकडून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अंतिम अहवाल येणे अपेक्षित आहे. तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ पत्रान्वये ओरॉन, धनगड या अनुसूचित जमाती आणि धनगर ही भटकी जमात यासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झाला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचा अंतिम संशोधन अहवाल प्राप्त झाल्यावर यावर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील सावकारग्रस्त शेतकऱ्यांची प्रकरणे निकाली काढणेबाबत**

**(५७) * ३०८९५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील सावकारग्रस्त शेतकऱ्यांची प्रकरणे निकाली काढणेबाबत लोकप्रतिनिधींसह शेतकऱ्यांनी डी.डी.आर कार्यालयावर दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चाचे आयोजन केले होते तसेच इरथळ (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील सरिता महादेव थोटे या महिलेच्या पतीने दिनांक १६ जानेवारी, २००२ मध्ये वा त्यासुमारास मंगू सिंग राठोड या सावकाराकडे शेत जमीन गहाण ठेवून घेतलेल्या कर्जाची परतफेड करुनही सदर जमिनीचा ताबा देण्यास सावकाराने नकार दिल्याने सरिताबाईंनी दारव्हाच्या सहाय्यक निबंधकाकडे तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मंगू सिंग राठोड, सहायक निबंधक, उपनिबंधक व पोलीस तपासात दोषी आढळून सुद्धा विभागीय सहनिबंधकांनी त्याला निर्दोष सोडल्याने सरिता महादेव धोटे या वृद्ध महिलेने मा.राज्यपालांकडे इच्छामरणाची परवानगी मागितली असल्याचे माहे मे, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) श्रीमती सरिता धोटे यांनी मंगू सिंग राठोड यांचेविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दारव्हा यांनी चौकशी केली. सदर चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी त्यांच्या दिनांक २/२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये प्रकरणी झालेला शेती खरेदीचा व्यवहार अवैध घोषीत करुन रद्द केला आहे.

जिल्हा उपनिबंधक यांच्या उपरोक्त आदेशाविरुद्ध श्री. राठोड यांच्या वारसांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे अपील दाखल केले. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक यांनी महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम, २०१४ चे कलम १७ नुसार साक्ष पुरावा तसेच उलट तपासणीची संधी न देता तसेच करारनाम्याची सत्यता न पडताळताच आदेश पारित केला असल्याचे

कारणावरुन विभागीय सहनिबंधकांनी त्यांच्या दिनांक ३०/३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक यांचे दिनांक २/२/२०१६ रोजीचे आदेश रद्द केले असून प्रकरणी अधिनियमातील तरतूदीनुसार फेरनिर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र गैरअर्जदार यांना निर्दोष सोडलेले नाही. विभागीय सहनिबंधकांच्या उपरोक्त आदेशानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याबाबत**

**(५८) * ३२९२० श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासीच्या शिक्षणाकरिता व आरोग्याकरिता शासनाने अनेक योजना करुनही त्यांची अंमलबजावणी होत नसल्याने त्यांच्या शिक्षण व आरोग्याबरोबरच दारिद्रयाचा टक्का ६३.७ टक्क्यावरुन ९१.१ टक्क्यावर गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

आदिवासी विकासाच्या राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वेळोवेळी विविध उपाययोजना करण्यात येतात. आदिवासींच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक व सर्वांगीण विकासासाठी अनेक नवीन उपक्रम राबविण्यात येत आहेत. ज्यामध्ये आदिवासी मुलांना नामांकित शाळेत प्रवेश, ५ % पेसा अबंध निधी थेट ग्रामपंचायतींना देणे, विद्यार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण, गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार, बालकांना अंडी-केळी, इतर मुलभूत सुविधांच्या योजना इत्यादी राबविण्यात येत आहेत. त्याशिवाय आरोग्य विषयक योजना या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयात 'जापनीझ झोन' निर्माण करण्यास स्थानिकांचा विरोध असल्याबाबत

**(५९) * ३०९३७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे 'जापनीझ झोन' निर्माण करण्यासाठी मुंबई-दिल्लीपर्यंतच्या सुमारे १०० किमी रुंद व १४८३ किमीचा लांब ६० हजार किमी. परिसरामध्ये परदेशी व खाजगी कंपन्यांच्या मोठ्या प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू, पालघर, तलासरी तसेच अनेक तालुक्यातील भूमिपुत्राच्या जमिनी-गावे नष्ट होणार असल्यामुळे सदरच्या प्रकल्पाला स्थानिकांनी तसेच पालघर जिल्हयातील आदिवासींनी व आदिवासी संस्था-संघटनांनी आदिवासी एकता परिषदेच्या नेतृत्वाखाली दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास भव्य मोर्चा काढून विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर अंतर्गत कोणतेही भूसंपादन प्रस्तावित नाही.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, पालघर यांचे स्तरावर मोर्चेकऱ्यांची दिनांक 17/4/2017 रोजी बैठक घेण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील वसतिगृहांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(६०) * ३२४३७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील वसतिगृहांची मूळ मान्यतेची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने २१ पेक्षा अधिक वसतिगृहांचे अनुदान प्रलंबित असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षभरात अनुदान न मिळाल्याने वसतिगृह चालकांची गैरसोय होत असून काही वसतिगृहांना १९६२ पूर्वी परवानगी मिळाली असूनही त्यांचेकडे मान्यतेची कागदपत्रे सापडत नसल्याने २१ पेक्षा अधिक वसतिगृह चालकांना समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) रत्नागिरी जिल्ह्यात मूळ मान्यतेचे आदेश नसलेल्या २६ अनुदानित वसतिगृहांना अनुदान देण्यात आलेले नाही. सदर वसतिगृहांची प्रादेशिक उपायुक्त, मुंबई यांचेस्तरावर दिनांक ३०/०६/२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. सदर सुनावणीचा अहवाल/ शिफारस प्रादेशिक उपायुक्त, मुंबई यांचेकडून आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडे सादर करण्यात येत आहे. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर अनुदान देणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड (पूर्व) येथील जयहिंद कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्थेचा बेकायदेशिर पुनर्विकासाबाबत

**(६१) * ३०९४९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयहिंद कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मुलुंड (पूर्व) (ता.कुर्ला, जि. मुंबई उपनगर) येथील नगर भूमापन क्र. १३२९ या मिळकतीमधील संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पास उप निबंधक, सहकारी संस्था, मुलुंड (प.) मुंबई ह्यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.प्रअ/१८२२/विनी/साधा/ दिनांक १५/४/२०१३ आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र. समृयो/२००७/प्र.क्र ५५४ /१४-स, दिनांक ३ जानेवारी, २००९ च्या शासन निर्देशातील मार्गदर्शक नियमावलीचे काटेकोरपणे पालन न करता सदर संस्थेस पूर्व परवानगीचे प्रमाणपत्र अदा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुलुंड (प्रा) मुंबई हे शासन निर्देशांचे काटेकोरपणे पालन न करता संस्थेचे पदाधिकारी व विकासक यांच्याशी संगनमत करुन सदर पुनर्विकास प्रकल्प बेकायदेशीरपणे राबविण्यात येत असल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही, तथापि, संस्थेच्या काही सभासदांनी पुनर्विकासाचे कामकाज शासन निर्देशानुसार होत नसल्याबाबतच्या तक्रारी उपनिबंधक, सहकारी संस्था, टी विभाग, (२) मुंबई यांचेकडे व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे केल्या आहेत.
(३) सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून, संस्थेच्या पुनर्विकासाबाबतची प्रक्रिया योग्य आहे. तथापि, संस्थेतील काही सदस्यांचा पुनर्विकासाबाबत आक्षेप असल्याने त्यांनी संस्था व विकासक यांचेविरुध्द मा.सहकार न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोंडगांव देवी (जि.गोंदिया) परिसरातील वीज पुरवठा बंद असल्याबाबत**

**(६२) * ३२२३४ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोंडगांव देवी (जि.गोंदिया) परिसरात मागील २० दिवसांपासून वीज पुरवठा बंद असल्यामुळे सदर परिसरातील शेतकऱ्यांचे वीज पंप बंद असून त्यांच्या धान पिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या धान पिकाचे नुकसान टाळण्यासाठी वीज पुरवठा सुरळीत सुरू होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बोंडगांव देवी परिसरातील वीज पुरवठा ११ एप्रिल, २०१७ रोजी व त्या मागील २० दिवसापर्यंत नियमित सुरु होता. ऑनलाईन तक्रार व बोंडगांव देवी या गावांत ठेवलेल्या तक्रार नोंद वहीत सदर कालावधीत बोंडगांव देवी येथे वीज पुरवठा बंद असल्याबाबत कोणत्याही तक्रारीची नोंद आढळून येत नाही. तसेच माहे मार्च व एप्रिल, २०१७ मध्ये बोंडगांव देवी परिसरात वीज पुरवठा करणाऱ्या वाहिनीवर फक्त ६ तासच वीज पुरवठा बंद असल्याचे दिसून येते.

(२) बोंडगांव देवी परिसरातील कमी दाबाच्या तक्रारी दूर करण्यासाठी या परिसरात ११ के. व्ही. सांनगडी वाहिनीवर एकूण ३ कॅपॅसिटर लावण्यात आले. बोंडगांव देवी येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे प्रस्ताव पूर्व विदर्भ जिल्हा योजनांतर्गत समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच अर्जुनी मोरगांव येथे नविन १३२ के.व्हि. उपकेंद्राचे कार्य प्रगतीपथावर आहे. सडक अर्जुनी तालुक्यात खोबा येथे ३३/११ के.व्हि उपकेंद्राचे काम तसेच ११ के.व्हि. सानंगडी वाहिनीचे विलगीकरणाचे काम दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत समाविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नियमित शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(६३) * ३२१८० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-२०१७ या वर्षात औरंगाबाद जिल्ह्यातील ७०,९९० मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केले असून त्यापैकी केवळ २०,९४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली व अद्यापही ५०,००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या समाजकल्याण विभागांतर्गत वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम रुपये ३०० कोटी तातडीने देण्याच्या मागणीसाठी पीपल्स व्हॉईस, बहुजन रिपब्लिकन विद्यार्थी मोर्चा, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी या संघटनांनी औरंगाबाद येथील समाजकल्याण कार्यालयाला माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात टाळे ठोकल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाकडे थकीत असलेली शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय, सन २०१६-२०१७ या वर्षात औरंगाबाद जिल्हयातील शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्रलंबित ११५७३ विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

(३) या प्रकरणी संबंधितांविरुध्द क्रांती चौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी प्रा.लि. (ता.श्रीवर्धन, जि.रायगड)**
**या कपंनीने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(६४) * ३२५१० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्राहकांना सुलभ सेवा उपलब्ध होण्यासाठी शासनामार्फत ई-सेवा केंद्रे सुरू करण्यात आली असून श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीच्या ई-सेवा केंद्रावर वीज बिलाचा भरणा करुनही वीज ग्राहकांना वीज बिलांची नोटीस आल्यामुळे सदर कंपनीने रुपये २२ लाख रक्कमेचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) श्रीवर्धन तालुक्यामध्ये महा ई-सेवा केंद्रामार्फत वीज बील वसुलीचे काम करण्यात येत होते. सदर केंद्र चालकाने वीज भरणा झालेली रक्कम रुपये २१.१५ लाख ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीच्या खात्यावर परस्पर जमा केली असल्याने पुढील महिन्यात ग्राहकांस वीज बीलात थकबाकी लागून आली. थकबाकी वाढत गेल्याने महावितरण कंपनीने चौकशी केली असता महा ई-सेवा केंद्र चालकाने गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले.

(२) सदर गैरव्यवहार प्रकरणातील संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार वीज ग्राहकांच्या थकीत वीज बिलांची रुपये १७ लाख महावितरण कंपनीच्या ग्राहकांच्या खात्यावर जमा केले असून उर्वरीत रुपये ४.१५ लाख वसुल करण्याची कारवाई चालू आहे. याबाबत चौकशी करण्यासाठी महावितरण कंपनीकडून महाऑनलाईन या कंपनीस दिनांक २२/०५/२०१७ रोजी चौकशी करण्यासाठी ई-मेलव्दारे सूचित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर महा ई-सेवा केंद्र बंद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील आदिवासी कन्यादान प्रकल्पांतर्गत झालेला गैरव्यवहार

**(६५) * ३२३७७ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील कळवणे, नाशिक, राजूर, तळोदा, नंदुरबार व यावल येथील आदिवासी कन्यादान प्रकल्पांतर्गत रुपये ३७ कोटींच्या गैरव्यवहाराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) चौकशी पूर्ण झाली नाही.

(२) व (३) तथापि, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक कार्यालयात कन्यादान योजनेतील मंगळसुत्र वाटपात अफरातफर झाल्याचे शासनाच्या चौकशी पथकास आढळून आल्याने, संबंधिताविरुध्द दिनांक १३/१२/२०१० रोजी सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक येथे गु.र.नं.६९६/२०१० दाखल करण्यात आला असून, सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक कार्यालयाकडून तपासाअंती सदर गुन्ह्याचे दोषारोपत्र दिनांक १६/०३/२०१२ रोजी मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) व भंडारा जिल्ह्यातील वृध्द, विधवा संजय गांधी निराधार योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(६६) * ३२३३१ श्री.आनंद ठाकूर, श्री.परिणय फुके, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेंतर्गत गडचिंचले, दाभाडी, दिवशी, चळणी, किन्हवली शिखंडी, आंबा या आदिवासी भागातील निराधार, वृध्द व विधवांनी कागदपत्रे जमा करून चार-पाच वेळा तहसिलदार (डहाणू) कार्यालयात अर्ज दाखल करण्यात येऊनही सदर अर्ज तहसिलदार कार्यालयात प्रलंबित असल्याने अर्जदार, लोकप्रतिनिधी व संघटनांनी मा.आदिवासी विकास मंत्री, मा.सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री व जिल्ह्याच्या प्रशासनाधिकारी यांच्याकडे सदर योजनेच्या अनुदानाचा लाभ मिळण्याची मागणी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भंडारा येथील आदिवासी निराधार योजनेच्या लाभापासून वंचित निराधार वृध्द अपंग मानधनासंदर्भात तहसील कार्यालयात चौकशीसाठी गेलेल्यांची दखल न घेतल्याने लाभार्थी सदर योजनेपासून वंचित असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्विकासाबाबत

**(६७) * ३१०५० श्री.नारायण राणे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २७४७८ ला दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नाणार-सागवे परिसरातील चौदा गावात केंद्र व राज्य शासनाची भागीदारी असलेला १३,६०० एकरवर सुमारे रुपये दोन लाख कोटीचा जगातील सर्वात मोठा तेलशुध्दीकरण प्रकल्प मंजूर करण्यात आला असून याबाबतची अधिसूचनाही माहे जून, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात जाहिर झाली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, स्थानिकांचे या प्रकल्पामुळे नुकसान होणार असल्याने शाळा बंद आंदोलन करुन या प्रस्तावास स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींनी तीव्र विरोध दर्शवून प्रकल्प रद्द करण्याची मागणी दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीनुसार सदर प्रकल्प अन्यत्र हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे,

प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या स्तरावर अशी निवेदने प्राप्त झाली आहेत. स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी शाळा बंद करून तीव्र विरोध केल्याचे वर्तमानपत्रातील बातम्यातून दिसून येते. सदर रिफायनरीसाठी भूसंपादनाची कार्यवाही प्राथमिक स्तरावर असून, सर्व खातेदारांना वैयक्तिक नोटीसा देवून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शंभू महादेव शुगर अँड अलाईड (जि.उस्मानाबाद) साखर कारखान्याने शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत**

**(६८) * ३२४१० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील शंभू महादेव शुगर अँड अलाईड या साखर कारखान्याने सहा महिने उलटूनही ऊस उत्पादन शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला दिला नसल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) शंभू महादेव शुगर अँड अलाईड लि. हावरगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद या साखर कारखान्याकडे हंगाम २०१४-२०१५ मध्ये एफ.आर.पी.ची रुपये २०६.८२ लाख रक्कम थकीत आहे. कारखान्याने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या याचिका क्र.२८९०/२०१६ या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने कारखान्यावर RRC आदेश पारीत करावेत, परंतु त्याची अंमलबजावणी करू नये असे दिनांक १०/०३/२०१६ रोजी आदेशित केले आहे. त्यानुसार साखर आयुक्त यांनी दिनांक १५/०३/२०१७ च्या आदेशान्वये RRC कारवाई केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. हंगाम २०१५-१६ व हंगाम २०१६-१७ मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कारखान्याने FRP अदा केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भ-मराठवाड्यातील उद्योगांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्याबाबत**

**(६९) * ३१९७२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८३६३ ला दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ - मराठवाड्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलतीच्या दराने वीज दर लागू करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपुर व मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशींवर अंतिम निर्णय घेण्याकरिता दिनांक ४ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत मंत्रीमंडळ उपसमितीने राज्यातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र डी. व डी.प्लस क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत निर्णयाचे अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण - २०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार वरील क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना इंधन समायोजन आकार, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर सवलत तसेच नविन उद्योगांना प्रोत्साहन पर सवलत देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भ-मराठवाड्याच्या धर्तीवर नाशिक विभागातील उद्योगांनाही सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्याची मागणी नाशिक येथील उद्योजकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त बाब '३' मधील मागणीचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक ०३/११/२०१६ च्या बहुवार्षिक वीजदर आदेशाच्या अनुषंगाने सुधारित आदेश दिनांक २४/०३/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) व (४) मागणी शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज महापारेषण कंपनीतील अतिउच्चदाब विद्युत रोहीत्र क्षमता बदल व दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७०) * ३३४०१ श्री.परिणय फुके, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१५८२ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य वीज महापारेषण कंपनीतील हजारो कोटीच्या कंत्राटांची एसीबी चौकशी सुरु असतानाच या कंपनीतील अतिउच्चदाब विद्युत रोहीत्र क्षमता बदल व दुरुस्तीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक ऑडिटर यांनी सदर बाब निदर्शनास आणून दिली असून यामध्ये चार इलेक्टिकल्स कंत्राटदारही सहभागी असल्याने याबाबतच्या आक्षेपाची कागदपत्रे संबंधित अधिकाऱ्यांनी गहाळ केली आहेत, हे ही खरे आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महापारेषण कंपनीच्या अहवालानुसार सदर कामात गैरव्यवहार झालेला दिसून येत नाही.
(२) संबंधित कागदपत्रे गहाळ झालेली नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वांद्रे (मुंबई) येथील महानिर्मितीच्या कार्यालयात**
**लघुलेखकाची पदे रिक्त असल्याबाबत**

**(७१) * ३१२८६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे येथील महानिर्मितीच्या कार्यालयात लघुलेखकाची अनेक पदे रिक्त असून मागील सहा वर्षांपासून पदोन्नतीही दिली गेली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लघुलेखकाच्या पदांना नियमानुसार पदोन्नती देण्याबाबतचे आदेश तत्कालीन संचालक, वित्त यांनी दिले असूनही सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीमध्ये लघुलेखकाची एकूण १४ पदे रिक्त असून, लघुटंकलेखक ते लघुलेखक या पदावर पदोन्नती देण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.
(२) महानिर्मिती कंपनीमध्ये सद्य:स्थितीत लघुलेखकांकरीता पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही. परंतु लघुलेखकांना पदोन्नतीचे लाभ देण्यासंदर्भात कंपनीस्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहोळ (जि.सोलापूर) तालुक्यात महावितरण कंपनीकडून नागरीकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(७२) * ३२४६२ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) तालुक्यात महावितरण कंपनीकडून देण्यात येत असलेली वाढीव वीज बीले, लोडशेडींग, धोकादायक लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, उघडया डिपी इ. अनेक कारणांमुळे येथील नागरिक त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात १२ तास लोडशेंडीगचा परिणाम पाणी टंचाईग्रस्त गावांना होणाऱ्या पाणीपुरवठयावर होत असून उघडया डीपीमुळे चरण्यास गेलेल्या गाई, म्हशी, शेळया इत्यादी जनावरे शॉक लागून मृत्यू होण्याचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) वीज ग्राहकांकडून प्राप्त होणाऱ्या अशा तक्रारींची तात्काळ दखल घेऊन महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयाकडून त्याचे निराकरण करण्यात येते. मोहोळ तालुक्यामध्ये माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ पर्यंत एकूण २४४ वीज बिल दुरुस्तीबाबतच्या प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. तसेच माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ मध्ये मोहोळ तालुक्यातील २६ गावांमध्ये उच्चदाब विद्युत वाहिनींचे ८२ गाळे तसेच लघुदाब विद्युत वाहिनींचे १८० गाळे ओढून ताण देण्यात आले आहेत व १० गावातील १७ वितरण रोहित्र बॉक्सची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(२) माहे एप्रिल, २०१७ तापमानातील बदलामुळे वीजेच्या मागणीत झालेली मोठी वाढ व तांत्रिक कारणास्तव उपलब्धतेत झालेली घट यामुळे दिनांक २७/०४/२०१७ ते ०६/०५/२०१७ पर्यंत कृषी वाहिन्यांवर वीजेच्या उपलब्धतेनुसार २ ते ३ तासांकरिता चक्राकार पध्दतीने भारनियमन करण्यात आले होते. त्यामुळे पाणी पुरवठ्यावर तात्पुरत्या स्वरुपात परिणाम झालेला होता. तसेच सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये उघडया डीपीमुळे, चरण्यास गेलेल्या गाई, म्हशी, शेळया इ. जनावरांना शॉक लागून मृत्यू झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) दिनांक २०/०५/२०१७ पासून कृषी वाहिन्यांवर अतिरिक्त भारनियमन बंद करण्यात आलेले असून कृषी वाहिन्यांवर पूर्वीप्रमाणे दिवसा ८ तास व रात्री १० तास चक्राकार पध्दतीने थ्री फेज वीज उपलब्धता देण्यात येत आहे. सध्या गावठाण वाहिन्यांवर भारनियमन करण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सदोष वीज मीटर बदलण्याबाबत

**(७३) * ३१८७३ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते : तारांकित प्रश्न क्रमांक २०४३१ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज वितरण कंपनीने बसविलेले सदोष वीज मीटर तातडीने बदलण्याचा निर्णय महावितरणामार्फत माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी आणि ग्रामीण भागात किती मीटर सदोष आहेत, उपरोक्त निर्णयानुसार शहरी व ग्रामीण भागात आत्तापर्यंत किती मीटर बदलण्यात आले आहेत तसेच उर्वरीत मीटर किती कालावधीत बदलण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त सदोष मीटर बदलणे व सदोष वीज मीटरमुळे ग्राहकांवर विद्युत बिलाचा जादा बोजा पडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदोष मीटर आढळून आल्यास सदर मीटर बदलण्याची कार्यवाही ही महावितरणाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून नियमाप्रमाणे नियमीतपणे करण्यात येते.
(२) व (३) शहरी आणि ग्रामीण भागात एकूण ११,४१,१९४ मीटर सदोष असल्याचे निदर्शनास आले असून सदर सदोष मीटर बदलण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे. कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून संगणक प्रणालीमार्फत वीज बिलाच्या संदर्भात असणाऱ्या तक्रारीचे नियमितपणे निवारण करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयात रमाई आवास योजनेच्या कामास विलंब होत असल्याबाबत**

**(७४) * ३०८९७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात रमाई आवास योजनेच्या कामास विलंब होत असल्याने दारिद्रय रेषेखालील लाभार्थी सदर लाभापासून वंचित रहात असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी विलंब करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील नालंदा बुध्दविहार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेबाबत**

**(७५) * ३३१९६ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मागाठाणे, दामू नगर, कांदिवली (पूर्व) येथील नालंदा बुध्दविहार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेबाबतच्या विचाराधीन प्रस्तावावर अंमलबजावणी झाली आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच सदरहू भवनाच्या कामास प्रत्यक्षात केंव्हापर्यंत सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) दिनांक ३०/०३/२०१७ च्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत लेखाशिर्ष ३६३६ अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संस्थेस दिलेले आहेत. तथापि, याबाबतचा प्रस्ताव संस्थेमार्फत अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बारवी धरण ते मुरबाड (जि.ठाणे) दरम्यानच्या जलवाहिनीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(७६) * ३१०१७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारवी धरण ते मुरबाड (जि. ठाणे) येथील औद्योगिक वसाहती दरम्यान पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम प्रलंबित असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ३०० कारखाने बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

मुरबाड व मुरबाड औद्योगिक क्षेत्राकरिता मुरबाडी नदीमधून पाणी उचलून दरवर्षी जून ते मार्च या कालावधीमध्ये ३.२० द.ल.लि.प्र.दि. एवढा पाणीपुरवठा केला जातो. उन्हाळ्याच्या कालावधीमध्ये मुरबाडी नदीचा प्रवाह कमी होत असल्यामुळे पाणी उचलण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे मार्च ते जून या कालावधीत बारवी धरणातील पाणी सन १९९३-९४ साली टाकलेल्या ४०० मी.मी. व्यासाच्या मृदू पोलादी जलवाहिनीव्दारे आवश्यक पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर जलवाहिनी बदलण्याचे काम महामंडळाने पूर्ण केले असून, बारवी धरणातून दिनांक २२/०४/२०१७ पासून मुरबाड व मुरबाड औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांना ३.०० द.ल.लि.प्र.दि. एवढा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. त्यामुळे या दरम्यान कोणतेही कारखाने बंद झालेले नाहीत. बारवी धरण ते मुरबाड जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत टाकण्यात आलेल्या ४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम पूर्ण केले असून दिनांक २२/०४/२०१७ पासून बारवी धरणातून पाणीपुरवठा सुरु केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जैतापूर (जि.रत्नागिरी) प्रकल्पात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७७) * ३२५९७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (जि.रत्नागिरी) येथील मागील १२ वर्षापासून प्रलंबित प्रकल्पाच्या सुरक्षेसंदर्भात फ्रान्सचे परराष्ट्र सचिव यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय शिष्टमंडळाची मा. मुख्यमंत्री यांचेसमवेत दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत जनजागृती करणे व प्रकल्पात स्थानिकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प उभारण्यासाठी फ्रॉन्सच्या ईडीएफ कंपनीबरोबर शासनाने करार केला असला तरी जैतापूर अणू उर्जा प्रकल्पामुळे नागरिकांचे होणारे विस्थापन, मच्छिमार व्यवसायावर होणारे परिणाम, निसर्ग तसेच पर्यावरणाचा होणारा नाश इ. मुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होणार असल्याने अणुऊर्जेच्या सुरक्षितेवरुन स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्प हा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असून राज्य शासनाची या प्रकल्पास सहाय्यकारी भूमिका आहे. हा प्रकल्प न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन लि. या केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमामार्फत उभारण्यात येत असून त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर प्रकल्पाकरिता भूसंपादनाचे काम पूर्ण झाले आहे. अणुऊर्जा ही स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञान असून त्याचा वनस्पती, सागरीजीव आणि पर्यावरणावर तसेच मत्स्यव्यवसाय, शेती व फलोत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाही. तसेच सदर प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत ॲटोमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड (AERB) कडून प्रत्येक टप्प्यावर आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तूर खरेदी गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(७८) * ३०९५१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना आपला भाजीपाला थेट ग्राहकाला विकणे व कडधान्य यांच्या नियमन मुक्तीचा निर्णय मा.राज्यमंत्री, कृषी यांनी घेतला असल्याचे तसेच कमी किंमतीत आयात केलेली तूर हमी भावाने शेतकऱ्यांच्या नावावर विकून व्यापाऱ्यांनी रुपये ४०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचे मा.मुख्यमंत्री यांच्या माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी सर्वाधिक तूर विकणाऱ्या सुमारे १ हजार व्यक्तींवर गुन्हा दाखल करुन सी.बी.आय.मार्फत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी ११ लाख ७१ हजार टन तूरीचे उत्पादन झाल्याचे दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी व २० लाख ५० हजार टन तूरीचे उत्पादन झाल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी सभागृहात सांगण्यात आल्याने चार ते पाच आठवड्यातच उत्पन्नाची बदललेली आकडेवारी तसेच तूर गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) फळे व भाजीपाला, बाजार समिती यार्डाबाहेर नियमन मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र कडधान्य नियमन मुक्तीबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. आयात केलेली तूर हमी भावाने विकल्याची तक्रार प्राप्त नाही. मात्र, व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या नावावर तूर विकल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) होय.
(३) कृषी विभागाच्या जानेवारीतील दुसऱ्या अंदाजानुसार सन २०१६-१७ च्या हंगामात तूरीचे उत्पादन ११.७१ लाख टन अपेक्षित होते. तर एप्रिल मधील तिसऱ्या अंदाजानुसार तूरीचे उत्पादन २०.३५ लाख टन अंदाजित केलेले आहे.

केंद्र शासनाच्या PSF योजनेत खरेदी केलेल्या तूरीपैकी, ज्या १००० व्यक्तींनी सर्वात जास्त तूर विक्री केली आहे अशा १००० लोकांची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून चौकशी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.